
डॉ. नितीन मोरे
पक्षांतुराणा
दोन
अंकी
नाटक

# पक्षांतुराणां..

## (दोन अंकी नाटक)

## डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# पक्षांतुराणां..

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- ५ एप्रिल २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे सेहचाळीसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# पक्षांतुराणां..

## दोन अंकी नाटक

## लेखक : डॉ.नितीन मोरे



# पक्षांतुराणां..

## अर्पणपत्रिका

कल्पनेहूनही काल्पनिक कल्पना सत्यात आणणाऱ्या काल्पनिक देशोदेशीच्या काल्पनिक धुरंधरांना ही काल्पनिक कलाकृती 'सादर' अर्पण




# अंक पहिला

# प्रवेश पहिला

सूत्रधार:

नमस्कार मंडळी! नमस्कार!

मी कोण? प्रश्न पडला असेल?

चांगलंय!

नाही, मी कोण हा प्रश्न पडणं चांगलंय असं नाही!

तर कुठलाही का होईना, प्रश्न पडणं हेच चांगलंय!

काय आहे की आजकाल कोणाला कसलेच प्रश्नच पडेनासे झालेत! रेडिमेड उत्तरांचे गाईड्स फटाफट निघताहेत!

तर मी कोण?

प्रश्न आध्यात्मिक नाही! साधा सुधा प्रश्न! कोहऽऽम वगैरे नाही!

तर मी

तोच तो.. कुंपणावरचा!

म्हणजे त्या अर्थाने नाही!

नाही! सरडा तर नाहीच मी रंग बदलणारा!

मग मी कुंपणावर का आहे?

अहो, तिकडून दोन्ही घरांकडे लक्ष ठेवता येतं!

इकडे नि तिकडे!

आणि तसं आपल्याला काय खायचं वगैरे नाही. त्यामुळे दोन्ही घरचा पाहुणा उपाशी वगैरे राहण्याची भीती नाही!

तर मी इन्सपेक्टर!

पोलिसांतला नव्हे!

तर साध्या भाषांतरात इन्स्पेक्ट करणारा!

निरीक्षण करणारा, एक निरीक्षक!

तटस्थ!

सगळीकडे पाहणारा. पाहून तसा गप्प बसणारा!

का?

काही बोललो या बाजूने तर ती बाजू नाराज..

त्या बाजूने बोललो तर ही बाजू नाराज!

उद्या सत्तेवर कोण असेल कोणास ठाऊक!

तर मला उगाच गोत्यात यायचं नसेल तर..

मौनं सर्वार्थ साधनं!

काय दिसतंय ते मात्र सांगतो.

बाकी तुम्ही अज्ञ नाहीत, म्हणजे सुज्ञ आहातच!

तर मंडळी,

आपण दुतोंडी आहोत का?

म्हणजे पहा, एकीकडे आपण म्हणतो, बदल हवा!

घोडा का अडला?

भाकरी का करपली?

न फिरवल्याने! बदल न केल्याने!

मग बदल हवा.. हवाच!

बदल हाच स्थायीभाव आहे म्हणे.

असं असताना काही लोकांचा पक्षबदल हा कुत्सितपणे पाहण्याचा विषय व्हावा?

कोणी त्यांची टर उडवावी. कुणी व्यंगचित्रातून उपहास करावा? कुणी त्यांना विनोद विषय बनवावे? कुणी ही यावे टपली मारून जावे?

का?

इतर अनेक बदलांप्रमाणे हे बिचारे पक्ष बदलतात. त्यांना उगाच सरड्याची उपमा द्यावी? रंग बदलती दुनियामें.. असला उपहास यांच्या वाट्यास यावा?

नाही!

तुम्हीच पहा आपल्या डोळ्यांनी ही कहाणी..

पक्षांतरांची.

पक्षी जाई दिगंतराची!

अशा आतुरांमुळेच तर लोकशाहीतले चैतन्य टिकून आहे.

आज एकीकडे असणारा उद्या दुसरीकडे..

दुसरा तिसरीकडे अन तिसरा अजून भलतीकडे!

व्यक्ती स्वातंत्र्याची परिसीमा ही.

अजून किती स्वातंत्र्य बहाल करणार कुणी कोणाला?

लोकशाहीतील हे स्वातंत्र्य पाहून मन भरून येतं..

पाहूयात अशाच पक्षांतर आतुरांची कहाणी..

पक्षांतरातुराणां म्हणावे का?

अशाच 'इतर' आतुरांना 'न भयं न लज्जां' असे  काही असल्याचे म्हणतात.. ते कदाचित असेल खरे.

आपला विषय तो नाही.

या पक्षांतरातुराणांना आपण न भयं नि न लज्जां असली विशेषणं लागू करावीत का?

आपण बापडे कोण आहोत?

कुंपणावर बसून दोन्ही बाजूंचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न करणारे सामान्यातिसामान्य नागरिक..

या सार्वभौम देशाचे!

बाकी बोलण्यावर कितीही मर्यादा येवोत.. बघण्यावर तर मर्यादा नाहीत!

तर प्रेक्षकहो..

विषय आहे पक्षांतराचा

पक्षांतर आतुरांचा..

पक्षांतरातुरांचा!

म्हणजे अर्थातच

पक्षांतुराणां!

पण एक मिनिट!

अहो.. हे आहे एक सुरस चमत्कारिक नाटक!

यातील गडबडपुरी राज्य काल्पनिक.. यातील पात्र म्हणवण्यास पात्र अशी पात्रं काल्पनिक!

आणि या पात्रांच्या शाब्दिक कोलांट्या उड्या देखील काल्पनिक!

अर्थात नाटक म्हटले म्हणजे काल्पनिकच असावयाचे!

तेव्हा यात सत्याचा अंश अंशभर देखील नाही!

उगाच लेखकाच्या लेखन क्षमतेवर नि कल्पनाशक्तीवर संशय घेऊन त्यास अंशभर ही कमी लेखू नका!

नाहीतर लेखक महाशय पक्षांतर करून कविवर्गात जाऊन बसायची शक्यता आहे!

आणि लेखक महाशय तसे पक्षांतरास आतुर नाहीत..

पण सांगण्यास आतुर आहेत ही पक्षांतरातुरांची सुरस गोष्ट ..

पक्षांतुराणां..



# प्रवेश दुसरा



एक आमदाराचं ऑफिस. त्याच्या बाहेर बसलेले दोघे. आबुराव अन बाबुराव. आमदार संपतराव साळुंखे यांचे खास कार्यकर्ते.

आबुराव:

अरं बाबु..

बाबुराव:

बोल माझ्या आबु ..

आबु:

अरं आज तारीख कंची?

बाबु:

कंची? म्हंजी तू कालची सांग.. मी सोत्ता डायरेक आजची सांगेन..

आबु:

लय हुश्शार की तू बाबु..

बाबु:

कसचं कसचं.. ह्ये उगीच आपलं. नायतर तू आसं कर..

आबु:

कसं करू म्हनतोस?

बाबु:

उंद्याची सांग तारीख.. मी सोत्ता आजची सांगतो..

आबु:

बाबु बाब्या बाबुराव.. किती हुशार रं तू. थोडं नशीब अस्तं तर साह्यबांच्या जागी तूच व्हायचा मंत्री बिंत्री..

बाबु:

नाय बा! मंत्री न संत्री न्हाई. आपले साह्येबच साह्येब हायेत नि आपण एक सेवक.. एकनिष्ठ. आरं तळं राखावं त्यांनी नि पानी चाखनारी मानसं आपण.. आपल्याला काय तळं राखाया जमायचं हाय आबुराव?

आबु:

ते बरीक खरं. तेथे पाहिजे जातीचे..

बाबु:

हितं जातपात कुटनं आली?

आबु:

हॅत लेका! एवडीबी भाशा कळंना? पद्धत अस्ते बोलायची बाबु. पन म्या तारीख का इचारली?

बाबु:

का इचारली?

आबु:

अरं किती महिने झाले..

बाबु:

कशाला किती महिने झाले? बायकोचे दिवस भरले? पुन्यांदा नंबरबिंबर लावलास की ..

आबु:

आरं गप की.. अरं बोलू तर दे पूर्ण..

बाबु:

बोल की रं.. इकता बोलतो पन प्वाट काय भरत न्हाई! बोलू दे म्हनतोय!

आबु:

तसं न्हवं!

बाबु:

मग कसं?

आबु:

अरं, साहेबांनी किती दिवसात पक्ष न्हाई बदलला..

बाबु:

पक्ष? मी काय म्हनतो? एका झाडावरनं दुसऱ्या झाडावर जातात पक्षी तशे नेते लोक उडून एकीकडून दुसरीकडे जातात म्हनून तर त्याला पक्ष म्हनत्यात का?

आबु:

हॅत लेका! तुला लोकशाई कळलीच न्हाई. आरं स्वातंत्र्य म्हनलं की पक्ष बदलायलाच हवा! न्हायतर स्वातंत्र्याला काय अर्थ?

बाबु:

हे बरीक खरं! कितीतरी दिवसांत पक्ष न्हाई बदलला.. कितीतरी दिवसांत दुस्रा झेंडा न्हाई फडकला..

आबु:

अरं सहा महिने झाले बाबा.. आपन जिथल्या तिथं.. एकच पक्ष.. एकच लक्ष. अशानं परगती कशी होनार?

बाबु:

परगती? का न्हाई हुनार? परगती अन इकास जनू दोन पोरं हायत साह्येबांची.. जल्मल्यावाचून ऱ्हातात होय?

आबु:

खरंय बाबु. नवनवीन पक्ष नि नवनवीन पोरं.. न्हाई म्हंजे परगती अन इकास! इक्त्या वरसात किती परगती नि किती इकास! एकदम झकास! पन तरी शोधतोय म्यां!

बाबु:

काय रं आबु? तू आंधळा कि बहिरा?

आबु:

आता म्या काय केलं?

बाबु:

काय केलं? काय न्हाई केलं इचार! आरं इत्ती मोठी गाडी.. एर कंडिशन.. हे इत्तं मोटं हाफिस.. एर कंडिशन.. गावाकडची फ्याकटरी..

आबु:

एर कंडिशन?

बाबु:

आब्या.. आबु.. आबुरावा.. अरं धा वरसापूर्वी यातलं काय हुतं?

आबु:

म्या हुतो की..

बाबु:

हॅ हॅ! अरं तुझ्यासारख्या इलासी मानसाचा  इकासाशी संबंध काय? धा वरसात झाला का न्हाई इकास.. जल्मली की न्हाई परगती?

आबु:

खरंय बाबु. साह्येब हाएत तर परगती हाए.. साह्येब हाएत तर इकास हाए..

बाबु:

म्हंजे.. साह्येब है तो यहांपर सबकुच है.. वर्ना ये चमन विराना है?

आबु:

अबे चमन.. पन खरंय बाबा. साह्येब हाएतच जादूगार..

बाबु:

यात काय सौंशय? पन तू तर तारखेचं कायतरी बोलत हुतास?

आबु:

आरं, इत्के दिस एकाच पक्षात.. पक्ष बदलला न्हाई साह्यबांनी इत्के महिने. एकच पक्ष. एकच झाड नि एकच पक्षी!

बाबु:

मग? पन साह्येबांना इकासाचा डोळा दिसत असनार अरजुनावानी..

आबु:

तुझं काय बी! साह्येब काय तो डोळा फोडणार?

बाबु:

ह्यात लेका! साह्येब इकासाचा डोळा न्हवं, इकासाची हांडी फोडतात! परगतीपथावर गडबडपुरी देश माझा! साह्येबांची स्लोगनच हाय!

आबु:

गन? बापरे बाब्या! अरं, सिलो की फास्ट.. गनचं भ्या मला भारी!

बाबु:

यडा की खुळा तू आब्या? ही गन म्हंजे ती गन न्हाई! स्लोगन म्हंजी ठाऊक न्हाई रं?

आबु:

हॅट रे! मराठी भाशाभिमानी आपण! इंग्रजी शब्दांचा सोस न्हाई आपल्याला. आनि साहेबांस्नीबी न्हाई. तूच आपला उगी इंग्रजी झाडत असतोस..

बाबु:

तसं न्हाई रे. मध्ये मध्ये अवशदापुर्तं इंग्रजी. यस्स फिस्स जमनार न्हाई. पन स्लोगन म्हंजी घोशना.. यून यून येनार कोन.. साह्यबाशिवाय हाये कोन.. साह्येब तुम आगे बढो.. हम तुम्हारे साथ हैं अशा घोशना असतात बाबा.. यानला स्लोगन म्हनतात..

आबु:

ठावं हाए. पन आपला भाशाभिमान हवा की न्हाई? न्हाईतर तशे मला बी येतात इंग्रजी शब्द.. गो इधर, कम उधर.. वगैरे.. पन ते जाऊ दे बाबु.. साह्येबांचा इचार तरी काय?

बाबु:

कशाबद्दल?

आबु:

हॅत लेका! इत्तं रामायन सांगितलं नि इचारतो अरजुनाची द्रुपदी कोन?

बाबु:

रामायनात द्रुपदी? आसंल बाबा! बदलला असेल पक्ष बिक्ष..

आबु:

अरं म्या पक्षबदलाबद्दल बोलत हुतो. पक्षबदल करायचा येळ झाला की कसं मस्त वाटतं.. मागच्या टायमाला कसं त्या गारेगार हाटेलात चार दिवस..

बाबु:

खरंय आबुराव! काय ते हाटेल.. काय ते खानं! कोंबडी अशी चापली म्यां.. चुलीवरची कोंबडी..

आबु:

खरंय बाबु. म्यां पन चापली. अरं दर सा महिन्यांत अशी पक्ष बदलायची सवै असली की आसं खायाला मिळतं. ते मोठमोठ्या हाटेलात ऱ्हायाला मिळतं.. फुकट्यात..

बाबु:

आबु, आब्या, आबुराव! फुकट्यात का म्हनून? अरं इकास नि परगती हवी तर समदं करावं लागतं बाबा. साह्येब म्हनतात, बदलत ऱ्हावं मानसानं. बदललं न्हाईत तर कापडं बी मळतात. मानसांचं काय घ्यून बसलास?

आबु:

अरं बाबु, खरंय तुझं. बदलायला हवंच. एकाच ठिकाणी घट्ट चिकटून बसाया आपण पोस्टाचा स्ट्यांप आहो की काय? तर म्या म्हनत हुतो ते ह्येच.. साह्येब पक्ष बदलायला इसरले की काय? एका ठिकाणी बसून पायाला मुंग्या यायला झाल्यात..

बाबु:

मुंग्या? आबाच्या अंगावर वारूळ हुनार का? आबुराव वाल्याचा वाल्मिकी हुनार?

आबु:

तुला गंमत सुचते? अरं, कितीतरी दिसात न्हाई हाटेलात गेलो. कितीतरी दिसात न्हाई फुकटात हादडलो..

बाबु:

अरं, इस्वास ठिव. साह्येबांचा कायतरी प्लान असनार. न्हाईतर इक्त्या दिसात साह्येबांचा सांगावा आला अस्ता.. आबु आन बाबु.. तयार ऱ्हा. नव्या पक्षात पक्ष्यावानी उडाया.

आबु:

आन इकासाचे दाणं टिपाया?

बाबु:

अर्थात गड्या! साह्येबांशी एकनिष्ठ ऱ्हायचे फायदे पाहातो ना तू?

आबु:

पन म्या काय म्हनतो गड्या.. साह्येब अजून का न्हाई गेले दुसऱ्या पक्षात.. अरं ती कोंबडी निस्ती आठवली तरी बी जिभंला पानी सुटतया. काय त्या हाटेलातल्या गाद्या नि गिरद्या.. पिसावानी मऊ नि मुलायम!

बाबु:

आन त्या चादरी एकदम तलम! सालं अख्ख्या आयुष्यात आपली घरं अशी न्हाई व्हायची..

आबु:

का न्हाई? इस्वास ठेव! साह्येब हाएत तर कल्याण हाए..

बाबु:

हा नवा कोन? तिसरा मुलगा? परगती नि इकास ठाऊक होते. इलास बी एक सावत्र मुलगा.. तो लोकांना म्हायती न्हाई जास्त.. पण ह्यो कल्याण कोन?

आबु:

हॅ हॅ. लईच भारी इनोद बुवा! अरं, साह्येब हाएत तर आपण आहोत. आपण दोघंबी.. डावा आन उजवा हात साह्येबाचा.

बाबु:

ह्ये खरं. इत्की वर्स झाली. साह्येबांबरोबर आपणबी पार्ट्या बदलल्या. मध्ये तर सकाळला उठलो की आठवायचं न्हाई, आज कुनाच्या पार्टीत ते..

आबु:

आपलं काय घ्यून बसलाय? साह्येबांची गंमत आटवते? भाशण ठोकायला उबे ऱ्हायले तर इसरले कालच पक्ष बदलला ते.. दोन वाक्यं बोलले आडवं तिडवं मग ध्यानी आलं.. अरं आपण आजच ह्या पार्टीकडनं बोलतोय! लोकांना काय वाटलं असंल?

बाबु:

काय पन न्हाई! अरं लोक इसरून जातात लगेच. हसतात दोन घटका.. दात दाखवतात.. राजकारन्यांना शिव्या देतात नि परत येतात.. पाया पडाया. ज्याच्या हातात ससा तो पारधी. ज्याच्या हाती सत्ता त्याला नमस्कार. साष्टांग दंडवत! जनरीत हाए. साह्येब उगाच न्हाईत सत्ता बदलली की पक्ष बदलत.

आबु:

नि पक्ष बदलला की सत्ता बदलत!

बाबु:

खरंय आबाजीराव!

आबु:

जनतेची सेवा फकस्त सत्तेत ऱ्हाऊन होते म्हनतात साह्येब.. काय खोटंय ते? इकास नि परगती नि कल्याण हवं तर सत्ता हवीच ब्वा. उगाच ताकाला जाऊन भांडं लपवायला जमत न्हाई. आपण आपला वाटा घ्यायचा न खुश ऱ्हायचं..

बाबु:

खरंय आबुराव! उगाच न्हाई तुला खाबुराव बोलतात लोक!

आबु:

बाबु.. अरं, इकडं सारेच खाबु! तू न म्या काय वेगळे आहो रे? आनि समद्यांचा इकास म्हनतात त्यात आपणबी आलोच की न्हाई सांग? तळं राखायची मेहनत करायची तर पान्याची चव बघावी लागते बाबा! आनि लोकांचं काय? न्हाई चाखलं पानी तर म्हनतील, काय फायदा साह्येबाकडं कामाला ऱ्हाऊन! श्रीक्रिष्ण गीतेत सांगून गेला प्रत्येक्ष.. आपण आपलं काम करावं.. फळाची अपेक्षा धरू नाही.. पन फळ मिळतंय तर त्याला न्हाई म्हनावं? क्रिष्णाला आवडलं असतं का?

बाबु:

लय भारी आबुराव! प्रत्येक्ष श्री क्रिष्णाची साक्ष काढतोयस! पन साह्येब कसे आले न्हाईत अजून?

आबु:

अरं, साह्येब अधिवेशनात बिझी हायेत. साहेबामागे काय कमी झेंगटं हायेत? येतील. तोवर आपण हितं वाट पाहायची.

बाबु:

खरंय आबुराव. संत सांगून गेलेत.. सब्र का फल मीठा रे भाई. सबुरी रखो..

आबु:

आनि साह्येब की वाट बघो.. युगे अठ्ठाविशे विटेवरी उबा..

बाबु:

उबा ऱ्हा उबग येईस्तोवर! बघ वाट वीट येईस्तोवर!

आबु:

वाट? बघतो बाबा! न्हाईतर वाट लागेल!

बाबु:

वाटलंच मला! विटेवर वीट येईस्तो वाट पाहावी न्हायतर वाट लागेल.. लोन्याचा वाटा घ्यून सत्तेत वाटेकरी व्हायचं तर पक्षांतराच्या वाटा धुंडाळायाच लागतात पन या येळंस वाट पाहा.. न्हाईतर साह्येब वाटेला लावतील..

आबु:

म्हंजे वाटान्याच्या अक्षता लावतील असं म्हन की..

बाबु:

अरं, वाटान्याच्या अक्षता वाटतील साहेब!

आबु:

तसं तर तसं.. खरं तर डोईवर मिऱ्या वाटतील म्हन! पन वाट फुटंल तितं जाऊन वाट लाऊन घेन्यापरीस ह्येच बरंय!

बाबु:

ह्ये बी खरंच! आपण जाहिरात द्यूया काय? साह्येब जिथं अस्तील तिथनं निगून या. आबुरावाचा जीव जान्याच्या बेतात हाए! अगदी जाऊ जाऊ करतोय!

आबु:

तर रं! अन तुजा बरा येऊ येऊ करतोय! नसत्या गमजा..

बाबु: अरं, एक आपली गंमत.. साह्येब येतच असतील..

# प्रवेश तिसरा

ना.संपतराव साळुंखे, मंत्री, कायदा खाते..

साहेबांची केबिन. साहेब एकटेच बसलेत. फोनवर बोलताहेत.

- कसं म्हनता भाऊसाहेब?

- न्हाई म्हंजे त्या अप्पाची भादरली म्हने.

- तिकिटी कापल्यात म्हने. कानावर आल्तं म्हनून सांगतुया. आपल्या हातात काय हाए म्हना?

- पक्ष बदल? सद्याच्या परिस्थितीत तर न्हाईच. विलेक्शनमध्ये सरशी हुनारच म्हणत्यात..

- ग्यारंटी?

- आसं कोन बोल्तं? उडत्या पाखराची पिसं मोजनारे तुमी. तुमी बोलायचं आन आम्ही आइकायचं.. हुकूम म्हना भाऊ साहेब..

- आमचं काय घ्यून बसलात? मद्दारसंघ तेवडा आप्ला म्हनावा. आजकाल मद्दार पण गद्दार बनू शकतात बगा.. साले नोट घ्येतील पन वोटची ग्यारंटी न्हाई!

- कुटं कुटं लक्ष घालनार? इकास कामाचा निधी हाए म्हनून भागतंय. लोक पन कायबी मागतात..

- तर हो! रस्ता पक्का हवा म्हनतात. उद्या यस्टी मागतील..

- त्ये आडगावचं पब्लिक.. त्ये तर लय इब्लिस म्हनावं.. प्यायचं पानी हवं म्हनत्यात! नदी आटली तर पानी कुटनं आनायचं ब्वा? आकाशातनं पाऊस पाडाया आपन काय वरूणद्येव आहो की काय? साधे नेतेलोक आपण. धरणं कोरडी, नदी कोरडी.. आपण काय करनार? घरच्या हिरीतून पानी टाकू बाल्डी बाल्डी?

- तुम्हाला सांगतो समदी शिश्टीम बिघडलिया.. वाया गेली समदी.. ही काय शिश्टिम हाए? दर पाच वरषानी विलेक्शन.. अरं जरा कुटं घडी बस्तीय तोच परत विलेक्शन. कुटनं आनावा पयसा भाऊसाहेब? आन लोक म्हनतात भ्रष्टाचार वगैरे..

- खरंय! आपल्या राजकारन्यांची दु:ख आपल्यालाच ठावं. पान्यात ऱ्हानाऱ्या माशागत आपले आश्रु दिसत न्हाईत कुनालाबी. दिस न्हाई न रात न्हाई. कामाला जुंपून घ्या. चोवीस तास वर टेन्शन. सालं कुनी बुडाखालची खुर्ची

ओढतं की काय? लोकानला दिसतो गाडी अन पयसा.. त्यामागची म्हेनत दिसत न्हाई..

- हां करतो म्हनावं लांडी लबाडी आपण. न्हाई न्हंजे पब्लिकमध्ये नाही कबूल करू आपण. पन आपल्याला बी ठावं हाए अन पब्लिकला बी. पन येत्यातच ना आपल्या पाया पडाया?

- निवडणुक म्हंजे सत्राशे साठ खर्च.. आजकाल कार्यकर्ता म्हनावा असा भेटतो कोन वो? समदे भाड्याचे तट्टू.. पयसा फेको इलेक्शन जितो.. गाववालं बी बेणं.. आइकत न्हाईत. मटन नि कोंबडी शिवाय बात न्हाई. कुटं कुटं पुरं पडावं आपण? कोंबड्याभी वयतागून जातील अन बकऱ्याबी.. त्ये म्हनतात ना.. बकरी जाते जिवानिशी.. तसलीच गत वो..

- न्हाई म्हंजे त्ये पक्ष बदलाचं आता न्हाई. परत सत्ता यील असा शीबीआयचा अंदाज हाए म्हनतात. हे लोकशाईचं काय कळत न्हाई बगा. लोकांचा च्यामारी लोकशाईशी संबंद काय? उगा इलेक्शन आली की एकेकाच्या पाया पडा.. मत द्या म्हनून भीक मागा. न केलेली कामं दाखवा.. आश्वासनं देत फिरा.. कटाळा येतो कदी खोटेपनाचा. शिश्टिमच अशी खोटी झाली म्हंता.

- तशी लोकं बरी असत्यात म्हना. म्हंजे त्यानला बी ठाऊक इलेक्शनपुरता आमी येनार. तोंड भरून आश्वासन देनार.. पन त्या दिसापुरते ते राजे. जे देऊ त्यावर लोकं खुश! बाकी दिस आहोतच आपन..

- तसा काय धोका न्हाई. ते जोतिषी लोक असतात बगा.. त्यानला कुनी इचारायला जात न्हाई अंदाज का चुकला बाबा तुजा? तसंच आपलं.. कुनी इचारत न्हाई.. आश्वासनाचं काय झालं? तर म्या काय म्हनतो द्यावी की बिंधास आश्वासनं?

- विलेक्शन जाहीरनामा? जाहीर सांगावा.. जाहिरात करावी म्हनून बनतो त्यो? मागच्या येळंला..

- न्हाई तव्हा आपण वेगवेगळया पक्षात होतो.. तर मागच्या येळेला आमच्या तव्हाच्या पक्षानं काय काय बाता मारल्या.. कुनी आलं इचारायला?

- आश्वासनांच्या जोरावर जिंकलो.. सरकारात गेलो.. च्यामारी सांस्क्रूतिक मंत्री.. राज्यमंत्रीपद खरं पन त्यात काय गंमत हाए? सांस्क्रूतिक वयताग नुस्ता..

- मग काय हो? पक्ष फुटला. बहुमताचं व्हतं चं न व्हतं करायला काय हो येळ लागतोय?

- तसा अन्भव हाए. राजकारनात हवं तव्हा आपली साइड बदलावी. म्या तर म्हनतोय, झोपेत कूस बदलावी तशी बाजू बदलता यायला हवी. याला स्वातंत्र्य म्हनतात की न्हाई? लोकशाई लोकशाई म्हंजे हीच!

- तिकिटी वाटप पाहू.. अवो पक्षाच्या एकनिष्ठांपेक्षा आमच्यासारख्यांना भाव जास्त.. कारन बी तसंच ना भाऊसाहेब.. आपण आपली इमेज तशी बनवून ठेवली.. आता तुमाला म्या काय सांगनार म्हना!

- चलती है तोवर चालून घ्यावं. उद्याचा काय भरोसा? मागच्या खेपेला अप्पानं लय प्रयत्न केला पाडायचा. आता त्योच संपल्यावानी हाए म्हना की. आपले पत्ते जपून खेळावे लागतात. भाऊसाहेब, तुमच्याकडनंच सारं शिकलो ना म्यां.. अवो तुमचं बोट धरून राजकारनात आलो. तुम्ही म्हनाल ती पूर्व. तुमच्या सांगन्याभायेर न्हाई हा संपतराव.. अप्पाला म्हनाव अशातशानं संपत नसतो हा संपतराव..

- भेटू लवकरच.. येतो की म्या सोत्ता पाया पडाया. तुमच्याच पक्षातला म्या. धाकलं भाऊ समजा. मोठ्यांचे आशीर्वादच कामी येतात.. तुमचा हात पाठीवर ऱ्हाऊ द्या..

संपतराव फोन ठेऊन आळोखेपिळोखे देतात. परत फोन वाजतो..

- वा! इत्का मंजुळ आवाज म्हंजे तूच असनार.. माझी मंजुळाबाई.

- लाडीगोडी न्हाई गं माझे बाय. जे खरं ते बोलाया नगं? काय न्हाई गं बाय माझे. राजकारन म्हंजे कामाला काय तोटा हाय व्हय?

- अर्धा तास? हां ते भाऊसाह्येबांशी बोलत हुतो. आता विलेक्शन आली तर समद्यांशी बोलाया लागतं. न्हाई बोलून कसं चालेल? ज्याचा त्याचा खराखोटा मान ज्याला त्याला द्यायचा..

- तुझा मान? तुझा तर पैला बाये.. कालचा घुंगरांचा आवाज कानात अजून बी हाये..

- आवडला ना चपलाहार? तू पेशल तर तुझ्यासाठी हार बी पेशल नगं का?

- घरला गेलतो? हां.. रात लय झाली. घरवाली बिचारी झोपून गेली. पन काय बी म्हन.. कालची मैफल झ्याक जमवलीस.. काय म्हनाली.. जवा पहा उसाच्या श्येतात पिकला मका, न राया मला सोडून जाऊ नका.. वा!

- अगं जावं तर लागतंच बाय! देवाधर्मासाक्षीनं गाठ बांधली तिला वाऱ्यावर सोडली तर विलेक्शनला काय भाव पडेल बाई? लोकं काय टपून बसलीत वायटावर..

- तुझी सर तिला न्हाई.. पन बी..

- मंजुळे, तुजा मंजुळ आवाजच आयकव बये.. हे दिवसरात कामात.. सभा नि संमेलन काय. आधिवेशण काय. पक्षाच्या बैठका नि दिल्लीतून बोलावणं येतं कदी बी.. त्यात तुजाच एक विरंगुळा गं बाई.. त्यात तू रागावली तर..

- खरं त्येच सांगतुया. तुला काय बी सांगाया तू काय आमची मद्दार हैस थोडीच? तिकडं काहीबाही सांगावं लागतं.

- यीन ना.. आता काही दिस दौरा हाय. तव्हा जमल तसं..

- अशी फुरंगटून बसू नगंस बाई. माझं मन कामात लागनार न्हाई मग.

- अगं या इलेक्शनीत जिंकलो तर ग्रुहमंत्री न्हायतर महसूल मंत्री.. त्याखाली बात न्हाई..

- भाऊ साहेब? तू बरी राजकारन शिकलीस? त्ये आइकतील? अगं.. न्हाई आइकलं तर आइकायला लावायचं. संपतराव साळुंखे नाव हाए माझं.. छप्पन अप्पा नि बारा भाऊसाहेब कोळून प्यालाय हा बारा गावचं पानी प्यालेला संपतराव..

- काय बी म्हन.. तू भेटली अन..

- हरभऱ्याचं झाड न्हाई गं. खरं तेच बोलतोय..

- बरं.. आज रातच्याला यून जाईन..

- बरं.. जानार न्हाई.. ऱ्हाइन.. तुझ्या पक्षातलाच म्या. घरी सांगतोच दौरा हाए, निवडणुका म्हनलं की काय.. कारनांची कमी न्हाई!

- आता ठेव.. जरा मद्दार संघाचं काही काम हाए..

- वाट न्हाई.. यीन येळेवर..

- न्हायतर वाट लागेल..

- इरोधकांना वाटेला लावून येऊ..

- वाटलंच मला..

- ठेवतो गं माझे वाटोळी बाई..

- अशी रागावू नगंस. वाटोळी म्हणजे तशी न्हाई. बंद्या रूपयावानी! वाटोळा रूपया! खनखनीत!

- लाडीगोडी न्हाई नि हरभऱ्याचं झाड न्हाई अन काय न्हाई.. तू भेटली अन वरवर चढत गेला ह्यो संपतराव. तुला कशाला झाडावर चढवू?

- बघू आजच्या रातीला! दौरा हाए..

- मद्दार संघात!

- आन तूच माझी मद्दार!

- आता ठेवतो फोन..

फोन ठेऊन 'अन राया मला सोडून जाऊ नका..' गुणगुणत बेल दाबतो. आबुराव आणि बाबुराव आत येतात.

आबु:

साह्येब.. काय आज्ञा?

संपतराव:

काय खबरबात आबुराव?

आबु:

साह्येब खबर काय असनार? विलेक्शनची बातमी आली की व्हायचं तेच व्हतंय!

बाबु:

मला तर वाटतं विलेक्शन म्हंजे एक मोठ्ठा समुंदर हाए, वेगवेगळ्या बोटीनं राजकारनी लोक निघालेत. नि जन्ता ठरवनार कंची बोट लागंल किनाऱ्याला.

आबु:

हुश्शार हायेस बाबुराव!

बाबु:

पन खरी मज्जा फुडंच हाए.. जी बोट बुडनार वाटतं तिच्यातून लोक उडी मारून जी तरनार वाटतं तिच्यात जातात.. तर साह्येब, हा असला सीझन सुरू झाला म्हनायचा की!

संपतराव:

कारं? आबुराव बाबुराव.. तुम्हाला कामं न्हाइत का? उगा जीभ कैचीवानी चालवताय? तसं खरं बोलताय तुम्ही. पन सीझन काय.. बोलता काय? अरं विलेक्शन सीझन मध्ये कुनी खरं बोलतो का? आन म्या म्हनतो कार्यकर्ते ना तुम्ही. इश्वासू? त्यांनी बोलावंच का?

आबु:

स्वारी साह्येब. हा बाबु तसा लय आगाऊच हाए. बोलत सुटला नि खात सुटला.. की जिभेला धरबंद न्हाई.. हाड न्हाई अजाबात!

बाबु:

तसं न्हाई साह्येब. म्या जे दिस्तं ते बोललो. आता पुन्यांदा अशी चूक न्हाई व्हायची! एकवार माफी करून टाका.

संपतराव:

अरं भरवश्याची मानसं तुम्ही. पार ग्रांप नि झेडपी पास्नं इथवर.. किती येळंस ग्रामपंचायतीत पंचायती केल्या. झेडपीत गेलो.. सर्पंच काय.. आमदार काय.. मंत्रीपद काय.. पार्ट्या किती येळंस बदलल्या.. तरी तुम्ही साथ सोडली न्हाई. जिवाभावाचे कार्यकर्ते तुम्ही लोक. तुमच्यावाचून संपतराव संपला असता.. मागच्या येळंस पक्ष बदलला तव्हा पन म्या हेच बोललेलो.. बोललो की न्हाई?

बाबु:

खरंय साह्येब. तुमचे आम्ही एकनिष्ठ पाईक.. या येळेस बी आम्ही आहोतच. तुम्ही फकस्त आदेश द्या. लागतोच कामाला की!

आबु:

तर हो साह्येब!

संपतराव:

मग काय? लागा तयारीस!

बाबु:

बग आबु म्या म्हनलं न्हवतं? साह्येबांची तयारी झालीया..

आबु:

व्हय तर! साह्येबांना हवेची दिशा बिनचूक कळते बाबु.. हवा वाहिल त्या दिशेला साह्येबांच्या टोकदार टोपीचे टोक दिस्तं म्हनतात..

बाबु:

वातकुक्कुटावानी!

संपतराव:

बाबांनो! इक्त्या वरसांची म्हेनत आहे ही. आन्भव लागतो. बारीक लक्ष लागतं सगळीकडनं. न्हाईतर पत्ता कट व्हनार. पतंगाची दोरी काटली जानार. सालं राजकारन न्हाई तर गजकरन हाए. पन एकदा उतरलं की माघार न्हाई! मग एकतर इरोधक जिंकनार न्हायतर आम्ही! शेंडी तुटो वा पारंबी!

आबु:

शेंडी तुटो साह्येब त्या अप्पासाहेब गिरमिटेची..

बाबु:

अन साह्येब तुम्ही सदा जिंकताच! इरोधी पक्षात असले तर सत्ताधारीत जाता!

आबु:

अन या येळेस तर एका सत्ताधारीतून दुसऱ्या सत्ताधारीत गेलते! लय मजा आलती साह्येब. डायरेक्ट पक्ष फोडायचा म्हंजे काय खायचं काम न्हाई!

संपतराव:

त्ये काय की अप्पासाहेबानी डाव साधला नि बनवला सांस्क्रुतिक मंत्री! तसा इंटरेस हाए मला लोककला वगैरेत, न्हाई असं न्हाई! पन च्यामारी हे असलं मंत्रीपद? अप्पाच्या नाकावर टिच्चून अप्पालाच चारीमुंड्या चीत करवला की न्हाई? कॅबिनेट मंत्री झालो.. ते बी कायदा मंत्री! खास आमच्यासाठी खातं निर्मान झालं ना राज्यात!

आबु:

तर साह्येब! काय द्या चं बोला असं इरोधक बोलत ऱ्हायले नुस्ते!

बाबु:

कायपन आबु! इरोधकानी गवरमेण स्थापन केलं की त्यानला इरोधक म्हनत न्हाईत बाबा! खरं की न्हाई साह्येब?

संपतराव:

आबु अन बाबुरावांचं कधी काय चुकतं थोडीच! अरं, मागे एकदा तर एकानं म्हेनत करून पक्ष फोडला.. तर त्या पक्ष फोडनाऱ्याला काय बनवावं?

आबु:

उपमुख्यमंत्री?

संपतराव:

हॅत तुझ्या. राजकारनातलं काय बी उमगेना आबुराव? अरं त्वांडाला पानं पुसली.. बनविला

बिन खात्याचा मंत्री!

आबु:

बाप रे! मग साह्येब त्याला खातंच नसेल तर काय खात्याचं नव्हतं व्हनार..

बाबु:

पन तुम्ही म्हंजे साह्येब ग्रेट! आम्ही तोंडात बोटं घालून आ वासून पाहात ऱ्हायलो. काय डाव मारला साह्येब! पट्टीचा कुस्तीगार जनू!

आबु:

जनू? अरं साह्येब भल्याभल्यांना लोळवतील..

संपतराव:

त्ये समदं ऱ्हाऊ द्या. चला, कामाला लागा..

आबु:

तुमचा हुकूम नि आम्ही लागलो कामाला साह्येब..

बाबु:

कंच्या ठिकाणी?

आबु:

काय बी इचारतो बाबु? साह्येब काय अशा तशा ठिकाणला नेतील का काय?

बाबु:

तुम्हाला सांगू साह्येब.. मागच्या येळचं ते.. लय बेश! बेस्टमबेस्ट एकदम!

आबु:

खरंच साह्येब! तशी वेवस्था करा! आमी आहोतच..

संपतराव:

काय रं आबुराव बाबुरावांनुं.. कशाबद्दल इक्तं बोलून ऱ्हायलाय?

आबु:

हाटेल साह्येब! मागच्या येळचं हाटेल बेस्ट!

बाबु:

साह्येब या येळंस कोणचा पक्ष?

आबु:

जो पन आसंल.. हम तुम्हारे साथ है! बाबु.. स्लोगन बोलत्यात ह्याला.. ठावं हाय ना?

संपतराव:

आरं.. तुम्हा लोकांनला काय खूळ लागलंया? पक्ष बदलाया काय येड लागलय की खूळ?

बाबु:

अरंच्चा! मग तयारी कशाची?

आबु:

तुम्हीच तर बोललेलात.. तयारीला लागा!

संपतराव:

हॅत तुमची! अरं विलेक्शनच्या तयारीला लागा म्हंतो मी.. या खेपेस ग्रुहमंत्री नायतर महसूल! सालं असं साधं खातं या खेपेस न्हाई!

आबु:

खरंय साह्येब.. देश का नेता कैसा हो..

बाबु:

अपने साह्येब जैसा हो!

संपतराव:

व्हय ना? मग लागा तयारीला..

आबु:

तुमचा हुकूम.. चल रे बाबु.. तयारीला लागू.. पन एकवार.. हीच पार्टी कन्फर्म ना साह्येब? नायतर ऐन वक्ताला गोंधळ!

बाबु:

साह्येबांनी एकदा बोललं की बोललं.. साह्येब तडक जातो नि फडक कामाला लागतो.. कडक सलाम करतो..

दोघेही ऐतिहासिक नाटकातल्यासारखा वाकून सलाम करून जातात.. संपतराव बायकोला फोन करतात..

- आम्ही बोलतोय..

- न्हाई, काल जरा उशीरच झाला. हे राजकारन म्हंजे.. कदी वाट्टं सारं सोडून द्यावं नि सरळ घरला यावं.

- एकुलती एक तू माझी बाईल. तुला ठावं हाए.. पक्ष बदलले किती पन तू मात्र एकुलती. किती दिसांत जवळ बसनं न्हाई का बोलनं न्हाई.. त्यात हा विलेक्शनचा सीझन. आता पाच सा महिने उसंत न्हाई..

- आली आठवन.. म्हनलं मिसेस कलावतीबाई साळुंखेंची खबरबात पुसावी.. काय करनार..

- तर बाईसाहेब, आज रातच्याला..

- न्हाई, उशीर न्हाई.. दौऱ्यावर निघतो.. उंद्याला येतो. सांभाळून ऱ्हा. पायाला भिंगरी लागल्यागत फिरावं लागतं.

- नगं रागावूस बाय माझी.. विलेक्शननंतर तुला घ्यून धा दिसांची सुट्टी घ्यून जाऊ..

- गोवा कशाला? मॉरिशस नायतर मालदीव! हैस कुठं?

- चल, ठिवतो कलावतीराणी..

- लाजताय तुम्ही? हितनं बी दिस्तंय!

- वाट पाहताय? येतोच जल्दीनं. नायतर लावाल वाट आमची!

- खरं न्हाई? नव्या नवरीवानी वाटेकडं डोळे लावून बसल्यात वाटतं कलावतीरानीसाहेब! वाटतं, उडून यावं.. आपल्या पिरमात कुनी वाटेकरी नसावा..

- बाळराजे? आमची गादी त्येच चालवनार. अजून ल्हान हैत.. पन..

- चला, ठेवतो. कामाचा डोंगर उपसायचा हाए..

# प्रवेश चौथा

स्थळ:

त्याच संपतरावांच्या ऑफिसाच्या बाहेर. आबुराव अन बाबुराव बोलताहेत..

आबु:

काय बाबुराव, झाला की न्हाई पचका? अन समदा झाला विचका!

बाबु:

अरं, काय सपनं पाह्यलेली? म्यां तर चार दिसापासून जेवत न्हवतो, कोंबडी चापायची तर भूक हवी ना म्हनून! पन इथे साह्येबा घरचेच उपाशी!

आबु:

मंग? आता म्हन की ल्येका, खाईन तर तुपाशी!

बाबु:

तसं बग, आबु, साह्येब हैत तर आपण आहो बाबा. साह्येबांनी केलं तर कायतरी विचार करून केलं असनार की न्हाई? अरं, राजकारन म्हंजे डोक्याचं काम. तुला न्हाई समजायचं!

आबु:

वा रे! सोत्ताला मोठा डोकेबाज ग्यानबा समजतो न्हवं? अरं, डोक्याचं काम हाय म्हनूनच तर तुला तिकडे एंट्री न्हाई! नो एंट्री!

बाबु:

वा रे आबुराव! अगदी फाडफाड इंग्रजी फाडतोयास! लय इद्वान दिस्तोयस! पन राजकारनातली गणितं काय आपल्याला कळतायत? तो अप्पा बघ, गप्प गुमान हाए आता. त्याने तिच्यायला आपल्या साह्यबाचा पत्ता कापला. मग साह्येबानी त्याचा डाव उलटवला नि झाले की न्हाई राज्यमंत्र्यावरून कॅबिनेट मंत्री? अरं काही वरसापूर्वी जानी दोस्त हुते दोघंबी. आता दोघांतून मेनबत्ती का पनती बी जाईना

आबु:

मेनबत्ती?

बाबु:

इकतं बी समजत न्हाई? अरं, इस्तव बी जाईना.

आबु:

हुशार हैस! पन अप्पा संपला भौतेक. चारी मुंड्या चीत! आता गडी काय उठत न्हाई!

बाबु:

ईश्वर अप्पाला सद्गती देवो.. च्यामारी, सत्ता नसली तर मरणच न्हाई का?

आबु:

आसंल. तसं बी आसंल. पन म्या म्हनतो आपल्याला काय त्याचं? चांगला पक्ष बदलावा साह्येबांनी नि त्याची फळं मिळावी आपल्याला! लय न्हाई, इक्कंच तर मागनं आपलं. अरं, थोडे चार दिस मस्त हाटेलात..

बाबु:

इसर. ते स्वप्न इसर. आन साह्येब न्हनले तसं कामाला लाग!

आबु:

हां, ते बरीक खरं म्हना. सब्र का फल मीठा! पन कामाला लागायचं म्हंजे?

बाबु:

जसं तुला ठावं न्हाई इक्त्या वरसात! इरोधकांची अंडीपिल्ली भाएर काढायची! नस्तील तर कुटली नवी कोंबडी पकडून तिला नवीन अंडी घालाया लावायची! आरं निवडनूक म्हंजे पाच वरसात येनारी होळी अस्ते बाबा. मारा हाळी आन आरोळी कुनाच्या बी नावानं! कोन कुनाला इचारायला जात न्हाई!

आबु:

पन साह्येबाच्या डोक्यात काय असनार? सीधा जाऊन इलेक्शन? सालं दर विलेक्शनला पार्टी बदलायची सवै त्यानला. मागच्या खेपेला ती बदलली म्हनून तर मंत्रीपद मिळालं.. पन आता निगाले दौऱ्यावर!

बाबु:

हां.हां.. मंजुळ दौरा!

आबु:

म्हंजे? हसतोयस ल्येका?

बाबु:

हसू नको तर काय? म्हनलं ना तू मुका आन आंधळा हैस. दिस्तं समोर.. पन बघायचं न आइयाकायचं न्हाई! अरं, साह्येब गेले त्या मंजुळाबाईकडं. दौरा म्हनं! पन एक हाए, गेले दोन वरीस हीच मंजुळा फिक्स! त्या अगुदर सुंदरा वऱ्हाडकर.. मग गुलाबबाई..

आबु:

म्हंजे मोठा इतिहास!

बाबु:

जसं हे बी तुला ठावंच न्हाई! पन अरं, साह्येबानी केली तशी या बायांनी बी केलेली पक्षांतरं! साह्येब सरपंच व्हते तर गुलाबबाई व्हती. तिनी आमदार पकडला तव्हा साह्येबाना सोडलं. आन साहेब आमदार व्हते तर तव्हाच्या सुंदराबाई.. त्यानला सोडून मंत्र्यांकडं गेल्या! बघ की, पक्ष बदलला त्या बायांनी देखील..

आबु:

म्हंजे अस की.. ह्या आबु आन बाबु सोडून समद्यांनी बदलला की पक्ष!

बाबु:

व्हय तर! अरं आबु नि बाबु सोडले तर खाबुगिरी जिथं, तिथं जात्यात समदे. पन आपण काय पाहतो? आज कमी तर उंद्या जास्त.. पन एकून खायला मिळतं दोन वखत त्यात समादान ठेवावं मानसानं. बाबु म्हने, ठेविले अनंते तैसेचि ऱ्हावे!

आबु:

वा रे! कीरतनकारच जनू! अन अनंतराव गिरमिटे नाव हाय बरं अप्पासाहेबाचं!

बाबु:

असंल.. पन हितं अनंत म्हंजे गिरमिट्या न्हाई! आपन तर ब्वा त्या अप्पाच्या सावलीला बी कदी उबं ऱ्हानार न्हाई.

आबु:

खरंय बाबा. आपल्या साह्येबावानी साह्येब भेटायचा न्हाई कुटं.. त्यो अप्पा मारी गप्पा .. नगं रे बाबा! मारू त्यावर ठप्पा!

बाबु:

ते सोड आबुजी. मला काय वाटतं ना .. राजकारन एखाद्या समुंदरावानी हाए. लाटा येतात जातात.. भर्ती काय आन ओहटी काय! मग समुंदराच्या किनाऱ्यावर होत ऱ्हातात, घडामोडी! त्यात कुनी सुंदरा तर कुनी उंदरा! कुनी गुलाब.. तर कुनी.. जु..

आबु:

बस बस! उगाच कवि लोकानसारखं यमकं जुळवत बसू नगस..

बाबु:

ऱ्हायलं! तर आपण फकस्त बगायचं.. बंदरावरनं..

आबु:

अन एखाद्या बंदरासारखं! बोल की!

बाबु:

तसं तर तसं! श्री क्रुष्नानं प्रतेक्ष सांगितलं तसं.. कर्तव्य करायचं..

आबु:

वा! लय भारी बोलतो तू! तत्वज्ञान!

बाबु:

अरे आबा, आपल्याला हवं त्याचं, हवं तसं तत्वज्ञान बनवता येतं! ह्यालाच तर राजकारन म्हनत्यात. अगदी पक्षांतरासाठीच न्हाई तर निवडनुकीत कुनाला पाडला.. कुनाकडून पयसा घेऊन कामं केली.. समद्यासाठी तत्वज्ञान पाजळता येतं बुवा! मोठमोठी खरी वाटावी अशी अन चांगल्या भाशेत तात्विक कारनं देता येनं म्हंजे तत्वज्ञान!

आबु:

तात्विक? हे काय ब्वा? आजवर इंग्रजी समजत न्हवती. आता मराटीबी समजनां!

बाबु:

अरं तात्विक म्हंजे मोठमोठ्या बाता! ऐकनाऱ्याला वाटावं किती मोठी गोष्ट सांगतोय हा भाऊ!

वाटावं किती बरं भाऊ तत्वज्ञानी! अरं, हीच तर राजकारनाची गंमत नि मग त्याला म्हनावं राजनीती नि रणनीती! त्यात मंग पालुपद.. जनतेची इच्छा.. इकासाचे राजकारन नि परगतीसाठी समदं काही! परगती कुनाची ते इचारायचं न्हाई.. जन्ताबी तशी समजून अस्ते पन समदे नेते म्हंजे उडदाची डाळ!

आबु:

म्हंजे? काळे गोरे!

बाबु:

लय हुशार तू आबु! अरं, आता इरोधकाला बदनाम करायचं काम आपलं. अप्पा गिरमिट्याच्या भानगडी काढायच्या..

आबु:

पन अप्पा तर विलेक्शनीत न्हाईच या येळंस?

बाबु:

त्येच तर.. साह्येबांनी त्याला गारद केला म्हंजे तो तसा पडून ऱ्हाईल? त्याला नेस्तनाबूत करायला हवंच.

आबु:

साह्येब बोलले असं?

बाबु:

साह्येब? त्यांच्याबरोबर इत्ती वरसं ऱ्हाऊन अजून समजलं न्हाई? हॅत रे तू नावाचा आबुराव! आता खरा सिझन सुरू झाला.. अब आएगा मजा..

आबु:

म्हंजे? आगे आगे देखिए होता है क्या?

बाबु:

अरं वा! इंग्रजीच न्हाई तर हिंदी बी? दिल्लीत जायची तयारी जनू!

आबु:

न्हाई रं. गड्या आपला गाव बरा! तरी बरं आपल्या साह्येबांना दिल्लीत रस न्हाई!

बाबु:

खरंय! अरे, म्हनून तर साह्येब पहिली इत्ती वरसं अपक्ष ऱ्हायलेले. अपक्ष म्हनलं की कसं.. कदी बी कुटं बी जायला मोकळं. वर पयशाचा पाऊस अन वट बी आपली. मग दर सा म्हयन्यात ह्या पक्षातून त्या पक्षात.. मागच्या येळंस मात्तर त्या पार्टीत गेले न ती पार्टी फोडून मग थेट मंत्रीपद! या येळंस बघू गंमत!

आबु:

खरंय रे बाब्या! पोस्टरं बनवायची, झेंडे लावायचे, भाशणं बनवायची.. सभा न मोर्चे न काय काय! लय कामं बाबा!

बाबु:

खरंय आबा! चल! उगाच येळ वाया दवडायचा न्हाई. एकेक क्षण महत्वाचा. साह्येबांना निवडून आनायचं म्हंजे सारंकाही करनं आलं.. भाशणबाजी.. नारेबाजी.. अन राडेबाजी..

आबु:

करूयात की! लावू जिवाची बाजी!

बाबु:

अरं, निवडनूक म्हंजे आपली रेशा आपल्या इरोधकाहून मोठी हाए हे दाखवायचं.. त्यासाठी आपली रेशा कोन मोठी करनार? त्याबरीक इरोधकाची पुसायची. पुसत पुसत मिटवायची.. तिथे खरं खोटं न्हाई पाह्यचं. सत्यमेव जयते असंल आपली घोशणा, पन ती घोशणाच हाए नुस्ती हे इसरून कसं चालेल बुवा? तव्हा सत्तादेवी ह्या एकाच देवीची उपासना करायची.. ती आपल्या गळयात माळ घालेल ह्ये पाह्यचं.. स्वयंवर म्हन की एक प्रकारचं! पन दर पाच वरसांनी येनारं!

आबु:

बाबु, बाब्या, बाबुराव! किती बोलशील? इक्तं बोलनं झेपायचं न्हाई प्रकरूतीला.. जरा दमानं.. अजून तर तयारीला सुरवातबी न्हाई झाली!

बाबु:

असं म्हनतोस? तर चल.. निघू!

आबु:

चल.. आइक..

बाबुराव नाना हो बाबुराव नाना..

लेना तुम लेना अरं तुमडीभर लेना

बाबु:

आबुराव येना अरं आबुराव येना

आली विलेक्शन तू कमावून घेना..

आबु:

खाबु राव नाना रं खाबुराव नाना..

आबु आणि बाबु:

किसको नहीं देना..

की पाकिटभर के लेना..


आबुराव नाना कि बाबुराव नाना

लेना तुम लेना अरं तुमडीभर लेना..

आबुराव नाना कि बाबुराव नाना

लेना सिर्फ, न देना.. अरं तुमडीभर लेना..

# अंक दुसरा



# प्रवेश पहिला

सूत्रधार:

तर मंडळी हे असं आहे!

विलक्षण गोष्ट म्हणजे गडबडपुरात विलेक्शन आलीय!

आजूबाजूला निवडणुकीचे खारे अन मतलबी.. नव्हे, मतलई वारे जोरदार वाहताहेत.

जो तो आता फक्त निवडणुकीबद्दल बोलतोय..

यस्स.. जो तो!

म्हणजे राजकारण्यांसाठी पंचवार्षिक परीक्षा ती. प्रगतिपुस्तकावर मतदाराची सही हवी.

ते तर येता जाता, कार्य करता निवडणुकीवर बोलणारच!

अगदी आचारसंहितेस अधीन राहून!

आणि जनता?

होय तीच!

जिचे येणार आहे आता औट घटकेचे राज्य.

तिला भारी रस या इलेक्शन मध्ये.

कोण काय काय देणार?

कार्यकर्त्यांसाठी बटाटावडा.. वडापाव .. बाकीच्यांसाठी नुसताच..

टुकटुक वडा? नाही भाव?

काही नशीबवानांना उमेदवार काहीबाही सामान वाटतील. साड्या काय.. भांडी काय..

काहींना वाटेला लावतील.

भाषणं होतील, घोषणा होतील.

जाहीरनामा नामक सुरस काल्पनिक कथा रचून वाटल्या जातील.

आश्वासनांचा पाऊस 'वचनें किं दरिद्रता' हे सुभाषित आठवत नि पाळत पाडला जाईल.

मग जनता कोणामुळे इंप्रेस होईल ते ठरेल.

मतदान होईल नि जनतेची उत्सुकता शिगेला पोहोचेल.

हीच.. आपला घोडा रेस जिंकेल?

निकाल लागेल.. काहींचा निक्काल लागेल.

विजयींच्या मिरवणुका निघतील.

जनसेवेच्या संधीसाठी तळमळणारे तडाखेबंद सेलिब्रेशन करतील.

आणि..

या पुढे निवडून आलेल्याचा नि निवडून देणाऱ्यांचे मार्ग वेगळे होतील..

निवडून आलेले आता जनप्रतिनिधी म्हणवतील.

आणि जनतेच्या नावाने तळ्यात मळ्यात खेळायला तयार होतील.

सरकार बनवायचे तर एकेकाच्या डोक्यावर किंमतीचा टॅग लागेल.

कोणा पक्षाला बहुमत मिळालं तर ठीकच. तो सरकार बनवायला घेईल.

आणि तिथेच विरोधातला पक्ष तो बहुमतातला पक्ष फोडायला छिन्नी हातोडा घेऊन सुरूवात करेल. परत तो किमतीचा अदृश्य टॅग कामी येईल.

आणि बहुमत नाही मिळालं तर?

अर्थातच राजकीय तबेल्यांत एकेका घोड्यावर प्राइस टॅग लागेल.

कुणी कुत्सित त्यास घोडेबाजार म्हणतील.

पण लोकशाही टिकवायची तर हे करावेच लागते!

किंवा बाबुराव बोलले तसे.. यास तात्विक मुलामा द्यावा..

तात्विक कल्हई करून आपलं पितळ सोन्यासारखं लखलखीत चमकवावं..

'जनतेच्या माथ्यावर निवडणुकीचा खर्च मारायचा नसेल तर ही तडजोड करावीच लागेल..'

किंवा

'स्थैर्यासाठी सारे काही..'

'परत निवडणुकांचा खर्च परवडणार नाही..'

'जनादेश आहे म्हणून..'

'जनादेश नाही म्हणून..'

वगैरे स्पष्टीकरणं करत पाडापाड व्हावी.. पुनर्बांधणी व्हावी..

पक्षांतराचा हा सिझन असा बहरात यावा!

पक्षांतरातुरणांचा हा सिझन..

अर्थात बाकी अवकाळी पावसासारखे अनसिझनल अवकाळी पक्षांतर ही होतच राहते..

लोकशाहीत हे स्वातंत्र्य बहाल झाले आहे..

तेच लोकशाहीचा गाभाच नव्हे काय?

किंवा अधिक अलंकारिक भाषेत बोलावे तर..

लोकशाहीच्या पवित्र मंदिराचा हा पावन गाभाराच नव्हे का?

तर

निवडणूक होतेय..

स्वयंवर होतंय..

सत्तासुंदरी कोणाच्या गळयात माळ घालेल?

कोण तिला लुभावेल नि कोण तिला निभावेल?

कोण पाडापाडी नि फोडाफोडी करून हरून ही जिंकतील किंवा कोण जिंकूनही हरतील?

कोण कोण अगदी काही दिवसांपूर्वी ज्यांच्या पाया पडलो त्या जनतेला वाकुल्या दाखवतील नि वेडावून दाखवतील?

पक्षांतरातुराणांचा खेळ रंगात येईल..

ती औट घटकेचं राज्य खालसा झालेली जनता काही तटस्थतेने, काही अचंब्याने नि बऱ्याचशा असहायतेने तोंडात बोटे घालत तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करेल..

पण तरीही म्हणेल..

अब आएगा मजा..!

सजा हीच मजा..

हीच या लोकशाहीची मजा..

पाहूयात तर

सापडतात कुठे कसे लोकशाहीचे दोरे.. धागे!

आणि

देखते हैं होता है क्या आगे आगे!

# प्रवेश दुसरा

ना.अप्पासाहेब गिरमिटे, महसूल मंत्री.. महाराष्ट्र शासन.. यांचे केबिन. मंत्रीमहोदय बसलेत. फोनवर बोलत आहेत.

- थ्यांक्यू.. हां, महसूलमंत्री पदावर मिटवला विषय! उगाच तुटेपर्यंत ताणायचं कशाला?
- कसलं काय रावसाहेब घेऊन बसलात! अरे, यांच्या थोबाडीत मारायला हवं..
- तशी भाषा वापरत नाही मी कधी.. पण ज्या ताटात जेवावे त्यातच..
- अप्पा गिरमिटेला संपवायला यांचे नाना यायला हवेत.. नानासाहेब नि तुपेसाहेब यांनी नाना प्रयत्न केले. पण हा अप्पा परत उभा तो उभाच!
- निवडणुकीला पण नि सरकारात पण! तिकिट काय कापलं..
- तसं नाही रावसाहेब. हे एवढं सोपं नाहीए. एकेकाचे डावपेच नि छक्केपंजे न ओळखायला मी काही बोळ्याने दूध पीत नाही.
- मग? आमची पण आपली एक किंमत आहे ना? वसुली करणारच की नाही? मंत्रीपदाखाली बात नाही रावसाहेब! तुम्ही असायला हवे होतात.

- अशा जोमात झाल्या वाटाघाटी! वाटाण्याच्या अक्षता लावायला त्यांना काय घाटी वाटलो आम्ही? आणि आमच्या गटापैकी तिघे झालो मंत्री..

- नाही हो! तीच तर मुख्य अट होती ना! म्हटलं आम्ही अपक्ष! आमचा बंडखोरांचा गट मोठा. अहो, तिकिट नाकारताना कुठे गेली होती अक्कल? यावं लागलं झक्कत पाया पडायला.. पण म्हटलं आमचं तिकिट कापणाऱ्याला कापणार असाल तर पुढचे बोलू. नाहीतर आहेच त्रिशंकू विधानसभा! आमचं काय जातंय?

- आजकाल काय झालंय ना, हे लोक नाही तर विरोधक आले असते आमच्या मागावर. कुठूनही का होईना पाचों उंगलियाँ घी मे! पाची बोटांना पचपचीत तूप!

- पण खरंय की नाही.. टेढी उंगलीसे घी नहीं निकलता!

- हां.. मारा टोमणे! मंत्रीपद मिळालं म्हणून तुपाच्या उपमा देतोय!

- कमीत कमी त्या संपतरावासारखा मिशीला तूप लावून तर नाही ना फिरत! त्याला न तूप पचलं आणि तूप खाऊन रूप येत नसतं हे समजलं!

- पण राजकारण म्हणजे आपल्याच पोळीवर तूप ओढून घेणं.. खरंय!

- ते? तुपेसाहेब! साहेब म्हणे! संपतचे बगलबच्चे! त्यांनीच तर सगळी चाल रचली! पण घी देखा पर बडगा नहीं देखा!

- बडगा म्हणजे काय? कोणास ठाऊक? वाडगा वगैरे असेल का हो?

- म्हण आहे हो तशी!

- सांगायचं काय ना.. सगळ्यांना खात्री होती म्हणे जिंकण्याची! दणदणीत बहुमत म्हणे!

- जनतेची कृपा आहे.. यावं लागलं ना आमच्याच पाया पडायला. जनता जनार्दन.. उगाच नाही म्हणत!

- अद्दल घडवली चांगलीच. खरं सांगू ना, पक्षाकडून लढलो असतो तर मिळाली असती का इतकी बार्गेनिंग पॉवर? तिथे हायकमांडची कमांड! इथे मात्र आमची डिमांड. होतं ते चांगल्यासाठीच! गुरूदेव म्हणालेलेच तसं..

- तेच तर सांगत होतो. त्या कटकट्या संपतराव साळुंख्याचा पत्ता पहिल्यांदा कट! आमच्या विरूद्ध कट रचताना सुचल्या नाहीत या गोष्टी? मारे उडत होता साळुंख्या साळुंकीसारखा.. गृहमंत्री व्हायचं होतं! आता स्वत:च्याच गृहात बसा म्हणावं! अहो, भाऊसाहेबांनी काड्या घातल्या नसत्या ना, तर लायनीत राहिला असता. पण..

- गुरूदेव म्हणतात, विविबु!

- म्हणजे? विनाशकाले विपरीत बुद्धी!

- कसं शक्य होतं ते? एकाच सरकारात दोन असे मंत्री समोरासमोर?

- तरी बरं एकेकाळचा जानी दोस्त!

- बसला असेल मंजुळाबाईकडे मंजूळ गाणी ऐकत. चाल काय सरळ आहे होय त्याची?

- संपतराव संपवला..

- नाही, अशातशाने कुणी संपत नाही. खरंय! सत्तेचा सारीपाट तो! सोंगट्या टाकायच्या. बुद्धीच्या बळावर सारं काही! पण मुळात ती असायला तर हवी! नुसत्या बाहुबळावर माजून चालतं होय?

- शपथविधीला होता ना. चेहरा पाहण्यासारखा झालेला. अंगाला राजकारणाची माती लागली तेव्हाच तर अस्मान बघायची तयारी ठेवावी लागते ना..

- मी काय म्हणतो? मंत्रीपद माझं पण गेलेलं. या खेपेला तर तिकिट ही कापलं गेलं! पण बसलो का दुर्मुखलेल्या तोंडाने?

- साळुंख्या चेहरा पाडून..

- अरे, आपल्याला कसं सदा हसतमुख रहायला लागतं. आत काय चालू याचा थांगपत्ता लागू नाही देता आला पाहिजे..

- ते नट लोक काय करतात असला अभिनय तर आपण करतो!

- तुम्ही पाहिजे होतात रावसाहेब! अहो, या दलदलीत तुम्ही नाहीत ते बरंय! राजकारण म्हणजे गजकरण..

- पण नेमके त्याचवेळी तुम्ही बाहेर होतात..

- चालायचंच! अहो, आपल्यासारखी मैत्री राजकारणाच्या बाहेरच होऊ शकते. नाहीतर आम्ही राजकारणी.. स्वत:च्या सावलीवरही विश्वास ठेवत नाही! मग मैत्री तर दूरची बात!

- दो हंसों का जोडा! खरंय..

- पण साळुंख्या बदक निघाला. हंस कसला?

- गुरूदेवांचा आशीर्वाद आहे. गेलो होतो आश्रमात पाया पडायला. चांदीच्या खडावा चढवल्या..

- ग्रह उच्चीचे आहेत म्हणाले गुरूदेव. फक्त थोडा सावधपणा बाळगा म्हणाले..

- बेसावधांचं कधी सावज होईल सांगता येतंय?

- कधी येताय इकडे? थोडं आधी कळवा. म्हणजे पूर्ण व्यवस्था होईल. अर्थात मंत्र्याघरी काय कमी पडणार आहे? जनतेचे सेवक आम्ही.

- मंत्रीमंडळाचा विस्तार होणार आहे म्हणे. लक्ष ठेवावंच लागणार! साळुंख्या उडत उडत पोहोचू नये कुठल्याशा फांदीवर!

- आमच्या जिवावर तर सरकार सुरू आहे. तेव्हा..

- भेटू ना! तेव्हा सांगू आतल्या गोटातल्या खास बातम्या!

- राजकारण! तिथे बातम्यांची काय कमी? म्हणजे बातम्यांची हमीच हमी!

- आम्ही नसतो तर पेपरवाले नि टीव्हीवाले यांचं काय झालं असतं? बघा, इतके रोजगार निर्माण करतोय आम्ही!

- चला, मिटींग असणार! कॅबिनेट!

- ठेवतो..

अप्पासाहेब फोन ठेवतात. फायलीत लक्ष घालतात. थोड्यावेळाने सेक्रेटरी मोहन मोहिते आत शिरतो..

मोहिते:

येऊ साहेब आत?

अप्पा:

या मोहिते. काय खबरबात?

मोहिते:

ती मिटींग आहे साहेब.. ट्रान्सपोर्टर युनियनशी.

अप्पा:

आजचा सगळा कार्यक्रमच सांगून टाका. म्हणजे जरा मानसिक तयारी करता येईल.

मोहिते:

होय साहेब.. (डायरी बघत..) ह्या पोर्टरांच्या मिटिंग नंतर..

अप्पा:

पोर्टर? की ट्रान्सपोर्टर?

मोहिते:

तेच साहेब! ट्रान्सपोर्टर युनियन नंतर दुपारी एका प्रदर्शनाचं उद्घाटन..

अप्पा:

भाषण तयार आहे?

मोहिते:

होय साहेब! चित्रकलाप्रदर्शन आहे पण भाषणात आंतर्राष्ट्रीय संदर्भ घातलेत आपल्या आदेशानुसार..

अप्पा:

आणि थोडे विनोद सुद्धा! खरेखुरे! नाहीतर आम्हीच विनोदविषय होऊ!

मोहिते:

चिंता नको साहेब. आपले लेखक चांगले काम करतील. मग मतदारसंघात एक शौचालय व गटारीचे उद्धाटन समारंभ.. भाषण तयार आहे.. त्यात भारतीय व पाश्चात्य शौचकुपांचे आरोग्यदृष्ट्या तौलनिक विवरण आहे.. म्हणजे अगदी प्राचीन सांस्कृतिक दृष्ट्या ही! अर्थात थोडक्यात! तिकडे एका फ्लशची साखळी ओढून उद्धाटनाची नावीन्यपूर्ण कल्पना आहे..

अप्पा:

छान!

मोहिते:

आणि गटारीच्या उद्धाटनासाठी तिच्यात खास स्वच्छ पाणी टँकरने आणून एक हजार एक कागदाच्या बोटी शाळेतील विद्यार्थ्यांच्या हातून सोडण्याचा

उपक्रम आहे. त्यासाठी शाळेतील मुलांना संध्याकाळी खास बोलावण्याचा आदेश पाठवलाय शाळांना.

अप्पा:

छान! उमलत्या पिढीला जोडून घेणं आवश्यकच आहे!

मोहिते:

मध्ये झांजीबार मधील शिष्टमंडळाची 'महसूल वृद्धीचे आधुनिक प्रारूप' या संबंधी भेट व त्यांना मार्गदर्शन. त्यानंतर गुरगुरपुरातील महिला उद्योजकांशी भेटीचा कार्यक्रम आहे.. पापड निर्मिती व उद्योग धंदा या संदर्भात..

अप्पा:

इतके सारे एका दिवसात?

मोहिते:

इतकेच नाही साहेब! अजून बाकी आहे! त्यानंतर आपल्या मतदारसंघात सत्कार समारंभ.. भाषण तयार आहे. कृतज्ञता व्यक्त करणारे. व प्रगती व विकासाला जन्म देताना होणाऱ्या प्रसूतीवेदना व्यक्त करणारे..

अप्पा:

हे काय? मोहिते ही भाषा कुठली?

मोहिते:

सॉरी साहेब! चुकून भाषणातील एक वाक्य वाचून टाकले! पण विनोदाच्या फोडणीशिवाय भाषणात ती गंमत येत नाही.. तुम्ही म्हणालात ते पक्कं ध्यानात ठेवलंय आपल्या पदरच्या लेखकवर्गाने..

अप्पा:

ठीकय. आज श्वास घेण्यास फुरसत नसेल असं दिसतंय.. पण हरकत नाही! जनहितार्थ सारे करणे आले! पण सगळीकडे पोहोचण्यास उशीर होईल..

मोहिते:

होय साहेब! वेळेची चिंता करू नका! लोक थांबतील. लोकांनाही सवय आहेच. वेळेवर गेलात तर तिकडे कदाचित आयोजकही आलेले नसतील.. तेव्हा..

अप्पा:

मोहिते.. बरं आठवलं.. ती दोघं आलीत का?

मोहिते:

कोण साहेब?

अप्पा:

ते संपतराव साळुंख्याकडचे दोघे.. एकनिष्ठ कार्यकर्ते.. म्हणाले आपल्याकडे यायचेय.

मोहिते:

कुणीतरी दोघे आलेत बाहेर.. तेच की काय? पाठवू आत?

अप्पा:

पाठवा! एकनिष्ठ .. होते.. बिचारे!

मोहिते जाऊन दोघांना आत बोलावतात.. आबुराव नि बाबुराव येतात..

आबु:

नमस्कार साह्येब!

बाबु:

नमस्कार साह्येब! आपल्या चरणी सेवा रूजू करावी म्हणून आलो..

अप्पा:

यावं! बरं का मोहिते.. एकनिष्ठ सेवक हे. दहा वर्ष संपतरावाकडे होते.. किती? दहा वर्ष.. किंवा त्याहून जास्तच. त्यानं पक्ष बदलले पण हे तिथेच.. आबु नि बाबुराव तसे दोघे हुशार आहात.. तेव्हा कामाला लागा!

आबु:

व्हय साह्येब! अन्भव हाए तसा!

बाबु:

अन अन्भवासारखा दुसरा गुरू न्हाई!

अप्पा:

चांगलंय! गुरू आहात दोघं. मोहिते यांना कामं समजावून द्या..

मोहिते:

होय साहेब!

अप्पा:

आणि चला, घाई करा.. एरवी रात्र थोडी सोंगे फार म्हणतात.. आज दिवस थोडा नि सोंगे फार म्हणायला लागेल!

आबु:

तर वो साह्येब! सगळी सोगं आणता येतात.. पण..

बाबु:

टैमाचं स्वांग न्हाई आनता येत! गेलेला टैम परत न्हाई आण्ता येत.. मग कसलं बी सोंग आना! बरोबर ना साह्येब?

अप्पा त्या आगाऊपणाकडे एक रागीट दृष्टिक्षेप टाकत बाहेर जातात. पाठोपाठ मोहिते पण जातो.

# प्रवेश तिसरा



अप्पासाहेबांच्या ऑफिसाबाहेर.

आबुराव आणि बाबुराव गप्पा मारताहेत.

आबु:

बाबु, बाब्या, बाबुराव.. च्यामारी काय बी बोललो तरी तो तूच! थोडी अक्कल जास्त न्हाई का कमी न्हाई, गुंजभरबी!

बाबु:

अरं, आबु, अगदी आबाजी, न्हाईतर आबासाहेब म्हनलं तरी बी त्योच ऱ्हानार की न्हाई? तुझ्या डोस्क्यात काय नवीन मेंदूवडा येनार हाए?

आबु:

मेंदूवडा? उद्या तू इडली डोसा म्हनशील! पन तुझी बी काय चूक म्हना! जितकी ज्याची अक्कल.. तितकं चड्डीला बक्कल! हाय का न्हाई?

बाबु:

तर रे. अरं आबुजीराव, या सा महिन्यात आपण काय शिकलो?

आबु:

काय?

बाबु:

समदे लोक इकडचे तिकडे, तिकडचे इकडे.. अन कुटकुटचे आनखीन भलतीकडे झाले..

आबु:

व्हय.. पक्षांतर! एका झाडावर्न दुसऱ्या झाडावर!

बाबु:

तर भौ, याचे बी दोन परकार हाएत बरं!

आबु:

म्हंजे रं? राजमान्य राजश्री बाबुसाहेब आता नवं तत्वज्ञान आइकवतात की काय?

बाबु:

तसंच न्हाई काही. पन लोकशाईत एकाच पक्षामधे बी गट असत्यात.. म्हंजे बघ कसा साळुंखे साह्येबांचा गट.. अप्पासाह्येबाचा गट.. तर आपण पक्षांतर केले म्हंजे झाड न्हाई बदललं.. तर एकाच झाडाच्या एका फांदीवरनं दुसऱ्या फांदीवर बसायला गेलो! अप्पा नि साळुंखे एकाच बाजूला पन वेगळ्या गटात हाएत का न्हाईत? तर आपल्यासाठी पक्षांतरात झाड बदलनं अन फांदी बदलणं असे दोन परकार हाएत. मोठ्या मानसांसाठी पक्षांतर म्हंजे गट बदलनं न्हाई तर डायरेक्ट पक्षच बदलनं.. म्हंजे वडाच्या झाडावरनं पिंपळाच्या झाडावर जानं.. न्हायतर भेंडीच्या झाडावरनं गवारीच्या झाडावर! आपण साळुंखे साह्यबाबरोबर करायचो ते मात्तर डायरेक झाडं बदलनं!

आबु:

किती आडगावच्या बोरवेलवानी खोल इचार करतोस! तरी त्याला इचाराचं पानी गावतं की न्हाई द्येव जाणे!

बाबु:

कर माझी थट्टा.. पन खोटं हाए का हे?

आबु:

पन काय रं.. तू तर म्हनलेला तू अप्पासाह्येबाच्या सावलीला बी उबा न्हाई ऱ्हानार?

बाबु:

त्ये.. तव्हा म्हनलेलो. अन बोललो तसं कराया लागलो तर ह्या राजकारन्यांचा कार्येकरता असल्याचा फायदा काय? आपन त्यानलाच आदर्श न्हाई मानत का? अन न्हाईतर लोक म्हनतील, हॅत लेकानो, शिकले काय बी न्हाईत तुमी.. पन ते सोड. बात हो गयी पुराणी. सा म्हयने हून गेले त्याला. आता मंजुळाबाई घे..

आबु:

म्या? न्हाई ब्वा! झेपायचं न्हाई! ही थेरं थोरामोठ्यांची! आपली एक बायको झेपत न्हाई त्यात ही तमासगिरीण.. न्हाई रं बाबा!

बाबु:

च्या मारी! तुला फकस्त एक उदाहरन सांगतोय तर तुझा आपला घोडा उधळतोय कल्पनेचं पानी प्युन! तर मंजुळाबाई घे.. न्हाई तिचं उदाहरन घे.. तिनं काय केलं?

आबु:

काय केलं?

बाबु:

हॅत लेका! डोळं नि कान नि नाक हमेशा उघडं ठेवावं मानसानी!

आबु:

डोळे न कान ठीक.. पन नाक? त्ये का ब्वा?

बाबु:

अरं, कुठं काय घडतंय, कुठं खिचडी पकतेय.. कुठं काय शिजतंय.. नुसतं वासांनी समजाया हवं.. न्हाईतर तू! फुकट ह्या राजकारन्यांचा कार्यकरता.. इक्त्या वरसात शिकला न्हाईस काय बी..

आबु:

बस बस! तू हाएस ना माझा कान, नाक अन डोळा बी.. तर मंजुळेचं काय सांगत व्हतास?

बाबु:

ते आधी सांगू? मंजुळेचं नाव घेतलं नि कान टवकारलंस लगेच सशावानी!

आबु:

ल्येका, तूच तर बोलला.. कान, नाक, डोळं उघडं ठेवाया..

बाबु:

अस्सं! तर साळुंखे साह्येबांची खुरची गेली तर मंजुळाबाईंनी पक्षांतर केलं.. आइकलं न्हाईस? आता बाईंचा पक्ष म्हंजे आपले शिक्षन मंत्री! म्हंजे बघ, झाड त्येच, फांदी बदलली!

आबु:

शिक्षनमंत्री! च्या मारी! त्यो बबन्या? आता झाला बबनराव? बबन्या बन गया जंटलमन?

बाबु:

म्हंजे? मोठं संस्थान हाए त्यो.. शिक्षनसम्राट! ज्ञानदानाचं पवित्र अन ग्वाड कार्य करतो.. ग्वाड कारन द्वाड बबनराव साखरसम्राट बी हाए ना.. त्याला ही ग्वाड अन मंजूळ बातमी भेटली ..

आबु:

अन त्यानं हत्तीवरनं साखर वाटली म्हन की!

बाबु:

आता कुटं बरोबर बोललास! पन सांगत हुतो ते हे.. इक्त्या वरसात आपन एकदा साइड बदलली पन आपन एकमेकाला सोडलं न्हाई! म्हंजे जिथं जाऊ तिथं एकच जोडी.. आबु अन बाबु! एकमेकाचा पक्ष आपन कायबी झालं तरी सोडायचा न्हाई!

अबु:

म्हंजे ये दोसती हम नही सोडेंगे! शोलेतल्यावानी! वीरू अन शेरू.. असे कोनतरी व्हते त्यात!

बाबु:

असतील! तर म्या म्हनत व्हतो ते ह्येच.. आपण साळुंख्यांचा पक्ष सोडला पन एकमेकांचा न्हाई..

आबु:

कारन, तू नाक कान अन डोला असशील तर म्या हाए घसा! बोंबलून सांगायला! पन सा म्हयन्यात नवा साहेब.. च्यामारी.. काय रं? साळुंखे बरा की हा अप्पा?

बाबु:

आपल्याला सा आठ महिन्यात बरकत किती आली ते पा.. नि ठरव! हाय काय अन नाय काय! बाकी साह्येबासारखा साह्येब! एकाला झाका दुसऱ्याला काढा! फकस्त हा साह्येब बोलतो भारी. गावची न्हाई.. शेहराची भाशा. भाशणं पन ठोकतो. सांळुंखे साह्येब बोलायचे तर लोक झोपायला लागायचे. अप्पासाह्येब बोलतात तर लोक हसत असतात..

आबु:

त्याला काय हुतंय! अप्पासाह्येबाचा भाशण लिव्हनारा चांगला असनार! साळुंखे साह्येब कुटं लिहिनार नि वाचनार? त्याकरता नीट लिहावाचाया यायला नगं? साळुंखेसाह्येबाचं काय? जे मनाला यील ते बोलत सुटा.. मग लोक काय तुमच्या सुटाबुटाकडं पाहनार?

बाबु:

काय बी! साह्येबानी कधी सूटबूट घातले? हां, त्ये एक भाएर गेलते कुटं दुसऱ्या देशात तव्हा घातलेला सूट.. च्यामारी त्या टायची गाठ मारायलाच किती येळ.. अरं, सहाठ महिने उलटून गेले. आपले साळुंखे साह्येब कशे असतील?

आबु:

अरं, मी अंदाज सांगू? साह्येब नवीन डाव सुरू करतील.. पन आपल्याबिगर कसं जमंल त्यानला काय ठावं?

बाबु:

तर तर.. तूच होता ना त्यानचा मेंदू! पन आपण बोललेलो साह्येबानला, पक्ष बदला. न्हाई आइकलं. आता बसले बोंबलत! नशीब तरी आमदारकी टिकली..

आबु:

का रे बाबु, साह्येबानला आपण सोडून गेलो तर किती वाईट वाटलं असेल? न्हाई म्हनलं तरी आपन डावा अन उजवा हात, डावा न उजवा पाय.. नि डावा अन उजवा डोला व्हतो!

बाबु:

का? डावा अन उजवा कान म्हन किंवा डावी अन उजवी नाकपुडी! दे की गड्र्या सोडून पुडी!

आबु:

अरं, आपल्या पुढं आदर्श उदाहरनच साह्येबांचं होते की न्हाई? ते बदलायचे पक्ष.. आज हितं उद्या तिथं! तर आपण तर त्यांच्या पावलावर पाऊल टाकलं गड्र्या! बुडत्या जहाजात कोन कशाला बसनार? तरी आपण वाट पाह्यली कितीतरी..

बाबु:

त्ये बी खरंच! शेवटी आपल्याला बी पोटं हाएत.. अन लेकरंबाळं हाएत. कितींदा म्हनलं साह्येब पक्षांतर करा..

आबु:

ते बरीक खरं.. अरं घर फिरलं की वासे भी फिरत्यात म्हनतात. सत्ता काय आज हाए उंद्या न्हाई. तव्हा साह्येब जन बिन मछली सारखे..

बाबु:

त्येच! आपण त्येच सांगत हुतो! साह्येब ह्या जाल्यात घावू नका. आपला सवतासुभा सांबाळा. पन साह्येबाला पक्षाचं लयच पिरेम आलं.. आता बोंबलत बसा!

आबु:

अरे, चुकायचे हिशेब दोन चार. अप्पा कसे मासोळीगत उडी मारून वर आले नि महसूल मंत्री झाले.. थेट! पक्षांतरालाच किंमत असते बाबा. न्हाईतर अप्पासाह्येब बघ. अपक्ष म्हनून आले अन लोनी खाऊन गेले असं कसं झालं असतं? त्येच पक्षाचा आदेश मानत बसले अस्ते तर आज अप्पांचा साळुंख्या नस्ता झाला?

बाबु:

ते बरीक खरं! बाकी गड्या राज्याचं कायबी खरं न्हाई!

आबु:

का रं? समदं हाए तर वेवस्तित. काय गडबड न्हाई न गोंधळ न्हाई! ते काय म्हनता.. कायदा अन सुव्यवस्ता एकदम बाकायदा वेवस्थित!

बाबु:

म्हनलं म्यां.. नुसतं तोंड उघडून घसा फोडत बसलं की समोरचं दिसत न्हाई! अरं, मंत्रीमंडळात लय कुरबुरी चालू हाएत. अन पक्षात बी एक जन दुसऱ्याच्या उरावर बसाया मागतो तर पयला नरडीचा घोट घ्यू पाहतो..

आबु:

नरडीचा घोट? का रं नरडी गिलासात ओतून पितात की साह्येब चा पितात बशीतून फुर्र करत तशी?

बाबु:

ह्येच अडतं तुझ ब्वा. तुला चेष्टा सुचते अन इकडे कुनी बुडाखालची खुरची पळवली तर तुला पत्त्या न्हाई लागनार!

आबु:

न्हाय ब्वा! आपलं बुड एकदम.. काय म्हनतात ते.. फिस्क हाए. अन आपल्याला खुरचीच न्हाई तर ती जान्याची कशाल भ्या सांग तर!

बाबु:

ते बरीक खरं! अरं, त्या दिवशी जोरदार भांडनं झाली म्हने. मग अप्पासाह्येबांनीच थोडी मध्यस्थी केली.. ते बबनरावाचं अन साळुंखेसाह्येबांचं वाजलं म्हने पक्षाच्या बयठकीत..

आबु:

हे पटन्यासारखं हाए.. मंजुलेवरनं साळुंखे साह्येबाचा राग असनारच.. तव्हा खडाजंगी व्हनार! साळुंखे साह्येब चिडला असनार! त्यात च्यामारी तो बबन्या.. तो मंत्री झाला!

बाबु:

व्हय ना! इचार करून चकरायला व्हतं.. चवथी पास बबनराव शिक्षनसम्राट अन शिक्षनमंत्री! पन तुला सांगतो आबु, जे आपल्याकडे नस्तं त्याची किंमत जास्त असते मानसाला!

आबु:

खरंय.. तुला कशी अकलेची हाए..

बाबु:

हॅत लेका. माझी शेपटी वढायची एक संधी दवडू नको.. पन तू बोलला तसं.. आगे आगे देखिए होता है क्या!

आबु:

च्यामारी.. ह्या अप्पासाह्येबांनी पक्षांतर केलं तर?

बाबु:

काय पन! त्यानला काय आता मुख्यमंत्रीपदाच्या खुरचीवर बसवनार हाए कुनी? अन असे बी ते अपक्ष.. आपल्या ओरजिनल पक्षाबरोबर असले तरी अपक्षच की न्हाई.. पक्ष बदलाया मुळात तो असावा लागतो की न्हाई गड्या!

आबु:

ते खरं.. आपन ध्यान ठेवून ऱ्हाऊ म्हंजे झालं..

बाबु:

कोन बोलतंय हे? लेका तुझ्यानं न्हाई हुनार! म्या हाए.. मेंदूबाज! नाक, कान, डोळे उघडे अन तोंड बंद असनारा.. कसला तरी वास येतोय गड्या!

आबु:

ते बरीक खरं.. तिकडे कँटिंगमध्ये वडे तळताहेत. त्यांचा वास हाए.. खायाचा चान्स हाए.. खायचं म्हनलं की मागे हटायचं न्हाई..

बाबु:

मग ते काय बी असो! वडा असो नायतर पयसा!

आबुराव नाना ओ आबुराव नाना

वडापाव खाना कि वडा पाव खाना

आबु:

बाबुराव नाना कि बाबुराव नाना

चटनी संग देना रं चटनी संग देना..

बाबु:

आबुराव नाना ओ आबुराव नाना..

आबु:

पेटभरके खाना रं पेट भरके खाना..

आबु आणि बाबु:

आबुराव नाना नि बाबुराव नाना..

पोटभरून खाना चलो पोटभरून खाना

कुनी न्हाई देना तर खुदहीच लेना

ताटलीभर लेना ओ बचकाभर लेना..

बाबु:

आबुराव नाना कि आबुराव नाना

आबु:

बाबुराव नाना कि बाबुराव नाना..

# प्रवेश चौथा

संपतराव साळुंखेंचं ऑफिस. आजूबाजूला सुमसाम. सामान ही विशेष नाही. बिन मंत्रीपदाचा नुसताच आमदार त्यामुळे ऑफिस रिकामं..

स्वगत:

च्या मारी!

एक वरस व्हायला आलं.

ती मंत्रीपदाची खुरची गेली बुडाखालनं.

लाल दिव्याची गाडी गेली.

तो मान मरातब गेला. सालं लिफ्टमधला तो मानूस बी सलाम ठोकेना झाला.

कालच्याला तर कहर झाला. कँटिंगमधला तो म्यानेजर. दीड दमडी!

खाल्लेल्या गोष्टीचे पयशेच मागाया लागला!

त्याला ठावं न्हाई..

हा संपतराव खातो अन पचवतो बी.. समदं काही. बिल भरायला हा संपतराव काय वाॅरडिनरी मानूस हाए?

पन टाकले चार रूपडे त्याच्या तोंडावर.

आपले दिवसमान थोडे खराब हाएत तोवर.

आता आमदाराची गाडी.. च्यामारी! टोलवाला टोल भराया सांगतो!

साली काय किंमत हाए की न्हाई लोकप्रतिनिधी म्हनून?

पन जाऊ दे..

संपतरावाची ती काय म्हनतात ती.. मेम्री स्ट्रांग हाए एकदम.

एकेकाच्या नावाची लिस्ट बनवून ठेवतोया.

कवा न कवा हुईनच परत मंत्री कि न्हाई? बघून घीन.

जातात कुटं?

अवो, सत्ताधारी पक्षाचा आमदार म्या. मंत्रीपद त्या अप्पाच्या करनीनं गेलं तर काय हा संपतराव संपत आला का काय?

अन आमचीच ही अवस्ता तर इरोधी पक्षातल्याची काय? त्यानला तर कुत्रंबी इचारत नसेल.. लोकशाईची ही अवस्ता.. बघवत न्हाई ओ.. शिश्टिम बगा कशी!

एक वरीस म्हंजे बारा म्हैने.. आमची खुरची सुटली.. आता फिरतोय वणवण..

अप्पानं मारे गप्पा मारता मारता साधला ना डाव?

तिकिट न्हाई मिळालं तर बंडखोरी केली.

अन जनता बी कशी बघा. त्याच्या मानसांना जिकून दिलं..

खरं सांगतो तर हे उमगत न्हाई.. लोकशाईत लोकानचं काम काय? उगा त्यानच्या पाया पडा.. नमस्कार करा..

अरं, सत्तापदाची कवचकुंडलं लाभलेली लोकं आम्ही. असं वाॅर्डिनरी वेड्याबागड्या मानसांच्या पुढं वाकून मताची भीक मागायला बरं दिस्तं का? पन समदी शिश्टिमच बिगडलीया.. लोकशाईचं जरा जादाच कवतिक हून ऱ्हायलय इथं..

नाविलाज हाए म्हना.

तुम्हाला म्हनून सांगतो..

पक्षाच्या बयठकीत अप्पा नि त्याच्या मंडळींचं काय काम? अपक्ष न्हाई का ते? पन तिथं बी घुसाया लागलेत.

अप्पानं डाव साधला खरा पन म्या बी काय कच्च्या गुरूचा चेला हाए?

ज्या गावचा वड त्याच गावचा पिंपळ अन

ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी म्हनावं!

न्हाई दिला ना धोबीपछाड तर नावाचा संपतराव साळुंखे न्हाई.

पन कसा काय द्यावा याचा इचार करतुया.

त्यो दिस मात्तर दूर न्हाईच!

अरं, ह्यो संपतरावानं न्हाई त्या अप्पाच्या बुडाखालची खुरची पळवली तर नाव लावनार न्हाई!

त्यो अप्पा म्हंजे माझा जुना लंगोटी यार बरं. त्यो शिकलेला. म्हंजे चार बुकं शिकलेला.

म्या जीवणाच्या शाळंत शिकत मोठा झालेला. आन्भव मानसाला काय काय न्हाई शिकवत? तसा शिकून मोठा झालेला म्या.

राजकारन म्हंजे माझ्या डाव्या हातचा मळ.

च्या मारी!

या येळंस अंदाज चुकला कसा काय?

तरी त्ये आबुराव न बाबुराव सांगत होते..

पक्षांतर करा.. न्हाई मानलं..

तर दोगं सोडून त्या अप्पाच्या गोटात जाऊन मिळाली. गद्दारी! सालं धा पंध्रा वरसं यांची काळजी घ्या. न हे थोडे दिस पन सत्तेभाएर ऱ्हायला तयार न्हाईत? यांनीच डायरेक पक्षांतर करून टाकावं?

यांच हे बरंय म्हना!

आमच्या पक्षांतराला कायदाबियदा लावत्यात. पक्षांतर इरोधी कायदा!

बिचारे आमदार लोक!

च्यायला!

कायदा मानसासाठी का मानूस कायद्यासाठी कुनास ठाऊक! पन तसं बरं असतं.. कायदा बनवनारे बी आमच्याच गावचे का न्हाई? पळवाटा बनवल्यावाचून कायदा बनतो की काय?

तर कायदा मोडायचा बी अन मोडल्यासारखा दिसून पन उपेगी न्हाई..

इक्त्या वरसात तरबेज झालोय म्या. अन ह्ये कुटं कुटल्या साळंत शिकवत्यात थोडीच!

अन म्हनतात कायदा गाढव असतो. समद्यांना समान असतो..

समद्याना समान असतो म्हनूनतर गाढव म्हनत असत्यात त्याला.

अरे, हे जन्तेचे सेवक नि प्रतिनिधी याना नि सामान्य काळीबिंद्री जन्ता यांना एकच कायदा? त्याचा काय फायदा?

पन येक हाए..

पळवाटा कायद्यातल्या बाकायदा समजून घेनाराच पुढं आपल्या वाटंनं पळतो .. बाकीचे ऱ्हातात मागे! हातावर हात धरून!

पन मी त्यातला न्हाई!

कायतरी हातपाय हलवायाच पाहिजेत.

ते बी जलदीनं.

त्या अप्पानं जम बशिवला ना तर कायबी खरं न्हाई.

अन तो बबनराव!

मंजुळेला पळवनारा नामर्द!

शिक्षनसमराट म्हने! चार बुकं न्हाई शिकला.. अन हा शिक्षनमंत्री! काय शिकवील पोरानला?

आन माझी मंजुळा.. माझी व्हती. आता न्हाई. पन तिचा मंजूळ आवाज कानात आज बी आइकू येतो. ग्वाड होती.. पन गेली त्या साखरवाल्या बबन्याकडं!

विलेक्शन झाली..

आम्ही जिंकलो तवर लावायची लाडीगोडी.. जसा त्या अप्पानं पत्ता कापला, ही बाय फोन पन घीना अन दादपन देईना..

डायरेक पक्षांतर करून टाकलं म्हना!

पन तिची बी काय गलती म्हना..

अन म्या पन.. आधीचा अन्भव हाएच ना? सुंदराबाई.. गुलाबबाई..

पन कायबी म्हना, एक आमच्या घरधनीण कलावतीबाई कदी पक्ष बदलायच्या न्हाईत. देवाधर्मानं बांधलेल्या भार्येचं भ्रतारासाठी कर्तव्य करतील त्या.. आनि तुम्हाला सांगतो.. एक हे नवरा बायकोचं नातं जिथं पक्षांतर करू न्हाई.. म्हंजे तशा ठेवल्या तीन चार मंजुळासारख्या.. पन कलावंतीनीकरता माझ्या कलावतीला अंतर न्हाई दिलं.. तिकडे मात्तर पक्षांतर न्हाई!

बाकी कलावंतीन वगैरे काय.. राजकारनातल्या मर्द गड्याला इरंगुळा हवाच! जन्तेची सेवा करून श्रमपरिहार!

लय बोलतोय का म्या?

काय करनार?

येळच येळ हाए..

मंत्री व्हतो तर टाइम नसायचा न आता निस्ता आमदार हाए तर टैमच टैम नुस्ता.. कोनबी फिरकत न्हाई. न टीव्हीवाले न पेपरवाले. तव्हा यायचे बोंडूक घ्यून. कधीमधी यायची की टीव्हीवर छबी. आता कवचित कुनी येतं.
पन म्या एक पाहून ठिवलंय.. ते लोक मागे यायला लागले की समजावं, आपले दिस सुधरनार! बातमीत नायतर आपन येत न्हाय. बाकी बातमीत यायचं तर कायतरी येडवाकडं बोलावं लागतं. मग टाकतील हे लोक.. ब्रेकिंग न्यूज म्हने!

सेक्रेटरी कुलभूषण कुलकर्णी आत येतो.

कुलकर्णी:
साहेब.. आत येऊ का?
संपतराव:
बोला कुलकर्णी. काय काम?
कुलकर्णी:
साहेब, एक शिष्टमंडळ आलंय भेटीला. उसाच्या बाजारभावाबद्दल चर्चा करायचीय म्हणतात.
संपतराव:
आमच्याशी? म्या तर कुनी बी न्हाई तरी? द्या धाडून..

कुलकर्णी बाहेर जातो..

संपतराव:

वा! संपतराव.. दिस बदलत चालले वाटतंया. आपली किंमत उमगायला लागली लोकानला..

शिष्टमंडळ म्हणजे दोन जण आत येतात..

संपतराव:

या. काय सेवा करावी आपली? जनप्रतिनिधी म्हनून सदा सेवेस तत्पर..

पहिला:

नमस्कार साहेब. उस उत्पादक समितीकडून आलोय. मी दीपक कुरडईकर नि हे शांताराम साखरे पाटील.

पाटील:

उसाच्या भावाबद्दल चर्चा करण्यासंदर्भात आलो आहोत..

संपतराव:

साखरे! छान है की नाव! अन उसाच्या भावाबद्दल साखरे पाटील येनं म्हंजे.. लय बेस! नक्की आमच्याकडनं काय अपेक्षा हाएत?

कुरडईकर:

नाही. तसं नाही. पण त्यासंदर्भात आपला सल्ला हवा होता.

पाटील:

तुमचा अनुभव दांडगा आहे तेव्हा..

संपतराव:

मग?

कुरडईकर:

तर आम्हाला शिक्षणमंत्री नामदार बबनराव बोडकेंना भेटायचं होतं. त्यांचे साखर कारखाने आहेत. तेव्हा तुमची त्याकरता मदत हवी होती. पक्षातले ज्येष्ठ तुम्ही, बबनरावांची अपॉइंटमेंट मिळत नाही. बिझी आहेत म्हणे फार. कुणी आमदार म्हणाले संपतराव मदत करतील.

पाटील:

आपलं दालन रिकामं दिसलं म्हणून आलो..

संपतराव: (संतापाने)

उठा.. उठा.. चालायला लागा.

बेल वाजवतात.. कुलकर्णी आत येतो. तोवर कुरडईकर नि पाटील उठून उभे राहतात..

संपतराव:

कुलकर्णी.. यांना बाहेर काढा. कुणी ही यावं नि आम्ही रिकामे दिसतो म्हणावं.. बाहेर व्हा.. चालते व्हा..

कुलकर्णी: (त्या दोघांना)

चला.. बाहेर..

दोघांना हाताला पकडून बाहेर घेऊन जातो.

संपतराव:

ही शेवटली काडी.. याहून अपमान न्हाई करून घ्यायचा.. साली एक ती खुरची काय गेली.. पार किंमत न्हाईशी झाली.. खुरची विना म्या म्हणजे परकाशाविना सूर्य? पान्यावाचून विहिर? बिनकामाचा म्यां? रिकामटेकडा म्हनतात? हा कुलकर्णी काय कामाचा न्हाई. आबुराव नि बाबुराव ब्येस व्हते. त्यानला म्हायती व्हतं.. कोनाला भेटवा न कोनाला न्हाई.

संपतराव रागाने बेल वाजवतात.. कुलकर्णी आत येतो.

संपतराव:

कुलकर्णी कोनाला पाठवण्या आधी थोडी इचारपूस करावी. बबनरावाची अपाइणमेण घ्यून द्यायचं काम हाए आमचं? त्या बबन्याची अपाइणमेण? बोडक्याची अपाइणमेण!

कुलकर्णी:

सॉरी साहेब. मला वाटलं..

संपतराव:

काय वाटलं? साहेब रिकामा बसलाय.. बिनकामाचा? तुमी बी? एकेकाला बघून घीन..

कुलकर्णी:

सॉरी साहेब.. पण बाहेर एक दिनशक्ती पेपराचे वार्ताहर आलेत. त्यांना पाठवू की कटवू?

संपतराव:

कुलकर्णी, नवीन आहा. पेपरवाल्याला कटवायला इथली लोकशाई मेली न्हाई अजून. थोडं थांबू द्या. म्हणावं महत्वाची मिटिंग चालू हाए. फोनवर. ती झाली की भेटू .. जा तुम्ही.

कुलकर्णी जातो. संपतराव उगाच बसून राहतात. कधी फोन बघतात. कधी वेळ. थोडा वेळ गेला की बेल वाजवून सांगतात..

कुलकर्णी पाठवा आतमध्ये त्यांना..

पत्रकार जगन टिपणीस आत येतो. हातात फक्त मोबाईल. खांद्यावर सॅक..

जगन:

नमस्कार साहेब. मी जगन टिपणीस.

संपतराव:

या. दिनशक्तीचे बातमीदार. भेटलोय आपण रत्नांग्रीत..

जगन:

होय साहेब. स्मरणशक्ती चांगली आहे साहेब!

संपतराव:

तर. राजकारन्याला कायबी इसरून चालत न्हाई बाबा. सदैव असावे सावध.. न्हाईतर व्हाल सावज.. काय? खरं की न्हाई?

जगन:

होय साहेब. प्रजासत्ताक दिनानिमित्त आमची एक लोकशाही पुरवणी निघतेय. त्यासाठी लोकशाहीबद्दल मतं हवीत.. वेगवेगळ्या स्तरातील मतं गोळा करतोय आम्ही. तुमचा अनुभव दांडगा आहे तेव्हा ..

संपतराव:

पण इंटर्व्यू आमचाच ना? की दुसऱ्या कुनाचा घ्यायचा नि त्याच्याकडं पोचायसाठी..

जगन:

असं कसं. इतके मोठे नेते तुम्ही. खास तुमची मुलाखत घ्यायला आलो. त्या आधी ऑफ द रेकाॅर्ड .. कसं चालू आहे सरकार?

संपतराव:

नक्की ना रेकाॅर्डवर न्हाई. न्हायतर बोलता एक नि उद्या छापाल हेडलाईन! तसं हेडलाईनसाठी मटेरियल न्हाई माझ्याकडं आता..

जगन:

पण तुम्हाला मंत्रीपद सोडावं लागलं..

संपतराव:

कोनी सांगितलं? इत्ती वरसं मंत्रीपदाचा अन्भव होता तर म्याच म्हनलं पक्षकार्यासाठी मला मोकळा करा. काय आहे पक्ष ही आपली आई असते. तिची सेवा नको कराया? मंत्रीपद काय यील न जाईल.. परत ही यील. पक्ष बांदणी महत्वाची. अन हे रेकाॅर्डमध्ये छापून टाका.

जगन:

पण म्हणजे पक्षांतर्गत संघर्ष नव्हता?

संपतराव:

संघर्ष? अजाबात न्हाई. मतभेद म्हना हवं तर. पन ते कुटं नसतात? लोकशाई म्हनली की मतभेद आलेच. एकेकाला आपलं मत हवंच! जित्याजागत्या लोकशाईत हे हुनारच. अन आमचा पक्ष पक्षांतर्गत लोकशाई मानतो. पन मनभेद न्हाईत आमच्यात. तुमचा संबंध अप्पासाहेब नि माझ्या संघर्षाबद्दल दिसतो. तो पेपरवाले छापतात. आम्हीबी वाचतो, ते बी वाचतात. दोन घटका मनोरंजन! त्यावर तुमचे चार पेपर जादा खपत असतील नि टीव्हीवाल्यांना जास्त प्रेक्षक मिळत असतील तर आनंदच हाए. तसं बी आजकाल त्या सिरियल पेक्षा ह्या बातम्याच जास्त भाव खाऊन जातात म्हने. त्यात आमचं बी हे काँट्रीब्युशन म्हना!

जगन:

बरं. तर मुख्य प्रश्न. लोकशाही राज्याच्या संकल्पनेबद्दल तुमचं मत काय?

संपतराव:

उघड आहे. लोकशाईचे आम्ही पाईक. आम्हाला जनता निवडूण देते. आम्ही जनप्रतिनिधी. जनतेचं उदंड प्रेम हाच आमचा आधार. तव्हा लोकशाईत लोकंच महत्वाची. अन दर पाच वरसात येनारी निवडनूक.. त्यात जनतेचं नेतृत्वावर शिक्कामोरतब महत्वाचं..

जगन:

म्हणजे तुम्ही कट्टर लोकशाहीवादी आहात?

संपतराव:

अर्थात. न्हायतर इत्ती वरसं निवडनुका लढल्या असत्या अन जिंकलो अस्तो का?

जगन:

मग तुम्ही विरोधी पक्षाला किती महत्व देता?

संपतराव:

अहो, एक गोष्ट समजून घ्या. अंधार असतो म्हनून उजेडाला किंमत अस्ते. तसं इरोध हाए म्हनून सत्ताधारी पक्षाला सत्तेची किंमत वाटते. इरोधकच नसतील तर सत्ताधारी हुकुमशहा व्हतील की न्हाई? तव्हा इरोध महत्वाचा. आमच्या पक्षाच्या ध्येयधोरनात लोकशाई नि इरोधक दोनीबी तितकेच महत्वाचे हाएत.

जगन:

पक्षांतरावर बंदी आणावी असं वाटतं का तुम्हांला?

संपतराव:

शंबर टक्के. एकदा निवडून आला मानूस की पक्ष बदलला तर राजीनामा द्यायलाच पाह्यजे! काही अपवाद सोडा, ते लोकशाईसाठी महत्वाचे.

जगन:

लोकशाहीबद्दल तुम्ही जनतेला काय संदेश द्याल?

संपतराव:

संदेश देन्याइतका काय मी मोठा नेता न्हाई. जमेल तितका पक्ष अन राज्य उभारनीत खारीचा वाटा उचलनारा एक साधा कार्येकरता आहे म्या. तरीबी

संदेश द्यायचा असेल तर ह्येच.. लोकशाई शब्दातच लोकं हाएत. त्यांच्याबिगर लोकशाई अपुरी अन अर्धवट राहिल. तव्हा मद्दान करा. हवं त्या पक्षाला निवडूण आणा. लोकशाई जिवंत ठेवायची तर लोकानचा सहभाग हवाच.. सत्ताधारी अन इरोधक दोन्ही मिळून हे लोकशाईचं मंदिर उबं ऱ्हाते.. तव्हा मद्दान करून दोघानाबी निवडा. नि पाच वर्स स्वस्थ चित्त ऱ्हा ह्येच मी सांगू इच्छितो.

जगन:

धन्यवाद. तुमच्या व्यस्त कामकाजातून तुमचा अमूल्य वेळ दिल्याबद्दल आणि लोकशाहीबद्दलची आपली तळमळ व्यक्त केल्याबद्दल. येऊ आता?

संपतराव:

या! आनि थ्यांक्यू. तुम्ही पेपरवाले साध्या  आमदाराघरी आलात.. आनंद झाला!

जगन निघून जातो. संपतराव विचार करत बसून राहतात.. मग एकाएकी काहीतरी सुचल्यासारखं.. उठून उभे राहतात..

स्वगत:

आता सापडली गुरूकिल्ली. लोकशाई! आजवर वाटायचं च्यामारी ही लोकशाई. पन आज तिचं महत्व उमगलं आम्हाला. लोकशाईत कुनीबी

कव्हाबी आपलं मत बदलू शकतो. हीच तर तिची ताकद हाए. नि इरोधी पक्ष महत्वाचा असेल.. तर..

तर एकच..

ती जाहेरात हाए ना.. दाद खाज खुजली का दुशमन.. तसंच..

सर्व समस्यांवर एकच अक्सीर इलाज.. कैलास जीवन!

अन राजकारनातला इलाज.. त्योच!

पक्षांतर!

लोकशाईत इरोधी पक्ष का बनला?

कुनाला कुनाशी हातमिळवनी करायची असंल तर संधी नको?

एखाद्या नेत्याला पक्ष बदलायचा असंल तर त्या बिचाऱ्याने कुटं जावं?

म्हनून तर त्याच्या सोईसाठी येगयेगळे पक्ष बनविलेत लोकशाईत..

ठरलं..

लोकशाईचे आहो आम्ही पाईक..

(फोन मध्ये पाहात..)

कुठंय नंबर .. हां.. हॅलो! दादासाहेब नाईक?

म्या बोलतोय..

संपतराव साळुंखे..

# प्रवेश पाचवा

सूत्रधार:

तर

ऐका गडबडपुर राज्याची गंमतीदार गोष्ट

सांगण्यास हलविले आम्ही मुक्कामाचे पोस्ट!

काय झाले ऐका या देशी

ऐकून हरवेल भान.. थबकेल वेशीवर दरवेशी!

सुरस चमत्कारिक आणि व्हायब्रंट म्हणवणाऱ्या लोकशाहीला चालना देणाऱ्या घटना घडताहेत. अर्थातच राज्य आहे गडबडपुरी.

लोक हो!

गोष्ट काल्पनिक आहे.

राज्य काल्पनिक आहे.

मंत्री नि संत्री ही काल्पनिक आहेत..

तेव्हा घटना ही काल्पनिकच!

घटना म्हणजे राज्यघटना नव्हे!

तर घडणाऱ्या घटना!

लोकशाहीत कल्पांतापर्यंत काल्पनिक गोष्टी घडू शकतात..

घडवून आणल्या जाऊ शकतात..

कोणाच्या कल्पना?

कवि कल्पना?

नव्हे!

या आहेत लेखक कल्पना!

कल्पना नाही कोण आहे या नाटकाचे लेखक! पण नाटकच आहे म्हटले यातच सारे आले!

होय!

नाटक कधीच खरे नसते!

तेव्हा दौडला लेखकाच्या कल्पनेचा अश्व

नव्हे..

दौडविला लेखकाने कल्पनेचा अश्व

अन घेतले कवेत त्याने.. त्याला जमेल, झेपेल तितके.. राजकीय विश्व!

फुलविला लेखकरावांनी कल्पनेचा पिसारा

अन पहा मांडून ठेविला हा सारा पसारा!

कसा अस्ताव्यस्त सगळीकडे हा सारा!

बाजूला ठेवलेला पेपर उचलत..

दैनिक एकच दिनशक्ती..

बघा ही ठळक बातमी..

गडबडपुर राज्यात भूकंप.. राजकीय उलथापालथ!

तेराव्या महिन्यात दाभाडे सरकारचे तेरावे!

दादासाहेब देसाई नवे मुख्यमंत्री!!

बातमी अशी आहे:

आज रात्री उशीरा घडलेल्या नाट्यमय घडामोडींत गणपतराव दाभाडे मंत्रीमंडळाचा राजीनामा घेण्यात आला असून त्याजागी विरोधीपक्ष नेते श्री. दादासाहेब नाईक यांनी मध्यरात्री दोन वाजता मुख्यमंत्रीपदाची शपथ ग्रहण केली. संपूर्ण राज्य झोपेच्या कवेत असताना हा शपथविधी पार पडला. त्यांच्या बरोबरच श्री.संपतराव साळुंखे यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला असून त्यांना गृहखात्याचा कारभार मिळण्याची शक्यता असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

दाभाडे सरकार विरोधात पक्षांतर्गत कुरबुरी वाढत चालल्या होत्या. त्या असंतोषास वाचा फोडण्याचा आमचा लोकशाहीस धरून असलेला प्रयत्न पक्ष नेतृत्वाने असफल ठरवल्याने हे टोकाचे पाऊल उचलावे लागल्याचे संपतराव साळुंखे यांनी सांगितले. दादासाहेबांच्या सक्षम नेतृत्वाखालीच राज्याची वाटचाल प्रगतीपथावर होईल अशी खात्री पटल्याने श्री.संपतराव साळुंखे यांनी आपल्या पक्षाचा त्यांना विनाशर्त पाठिंबा असल्याचे पत्र दाखल केले असून त्याहूनही नाट्यमय रित्या गणपतराव दाभाडे, बबनराव बोडके व इतर यांना पक्षातून पक्षविरोधी कारवायांमुळे निलंबित केले आहे. राज्यपाल श्री. जोसेफ अजीजू यांनी भर मध्यरात्री शपथविधी समारंभ पार पाडून कार्यक्षमतेचे नवे उदाहरण घालून दिले असल्याचे ही श्री.साळुंखे म्हणाले. बहुतांश पक्ष आपल्याच पाठीशी असल्याने आपलाच पक्ष हा खरा असल्याचाही दावा त्यांनी केला. त्यामुळे पक्षातंर बंदी कायदा लागू होत नसल्याचेही त्यांनी सांगितले. दाभाडे सरकारचे वाभाडे काढत, गेल्या तेरा महिन्यात विकास ठप्प पडल्याने त्या सरकारचे तेरावे घालावे लागत असल्याचेही ते म्हणाले. आमचे सरकार हे जनताभिमुख असेल व संपतराव साळुंखेच्या साथीने पुढील चार वर्षे मजबूत स्थिर व कार्यक्षम कारभार करेल असे मुख्यमंत्री श्री.दादासाहेब नाईक यांनी दै.एकच दिनशक्तीला सांगितले. दरम्यान ह्या घटनात्मक पेचाची लढाई आम्ही न्यायालयात लढू असे माजी मुख्यमंत्री श्री.गणपतराव दाभाडे यांनी म्हटले आहे.

हुश्श!

ऐकलीत एका आयपीएलची कथा..

नका समजू यास जनसामान्यांची व्यथा!

इकडे लेखकास कल्पनेची काय कमी

आयपीएल असता मनोरंजनाची हमी!

काय म्हणालात?

आयपीएल क्रिकेटमध्ये?

छे!

इथे आय पी एल म्हणजे इंडियन पॉलिटिकल लीग!

बनवल्या जातात टीम्स.. त्यांचे वेगवेगळे मालक नि खरेदी करतात वेगवेगळे खेळाडू!

आणि आमचे तयार खेळाडू देखील आहेत तयार.. विकून घेण्यासाठी!

त्या आयपीएल सारखी ही देखील हिट.. दुसरी आयपीएल!

अहो, प्रगतीशील राज्यात प्रगतीशील सरकार!

पण खरं तर संपतराव म्हणतात ते खरं मानायचं तर पक्षांतर सम्राट म्हणवणाऱ्या संपतरावांनी पक्षांतर केलेलंच नाही.. आपला पक्ष फोडलाच नाही..

मग पळवला?

नाही!

असे कसे म्हणावे? मूळ पक्ष त्यांचाच! बाकीच्यांना बेदखल करून पक्ष पळवून नेला?

नाही!

खुद्द माजी मुख्यमंत्र्यांनी आपल्याच सरकार विरोधात कारवाया केल्या?

ऐकावे ते नवलच!

पक्षांतर?

की पक्षबदल?

की पक्षफोड?

की अजून काही?

हे कायदेशीर की बेकायदा?

गाढव कायदा आता कूर्मगतीने हालचाल करेल. आशा आहे की चार वर्षांची विधानसभेची मुदत संपेस्तोवर निर्णय येईल!

येवो न येवो!

आपली मनोरंजनाची सोय होईल.. टॅक्स फ्री!

लोकांना चघळायला विषय मिळेल..

चार घटका मजेत जातील!

टीव्ही न पेपरवाल्यांना हेडलाइनी सकट बातम्या मिळतील..

टीआरपीच्या लढायांना वेग येईल.

अर्थव्यवस्थेस चालना मिळेल..

होईल ते होवो!

आता आपला इंटरेस्ट संपतरावांच्या आयुष्यात काय बदल होतील यात आहे..

सर्वात प्रथम..

डगमगणाऱ्या बुडाखाली खुर्ची येईल..

नि ते बुड स्थिरावेल.

ती लाल दिव्यांची गाडी येईल..

त्या गाडीला सर्वत्र संचारास मुभा. वाहतुकीचे तुच्छ नियम तिला लागू नाहीत.

येता जाता त्यांना सारेच सलाम ठोकतील.. होय तो लिफ्टमधला माणूस.. लिफ्टमॅन देखील!

कँटीनमध्ये साळुंखेसाहेब गेलेच तर बिल मागायची कुणाची हिंमत व्हायची नाही.

साहेब आता लय बिझी होतील..

कुणी उगाच त्यांच्या केबिनकडे फिरकू शकणार नाही.

एकच देनिक दिनशक्तीवालेच नव्हेत तर झाडून सारेच पत्रकार आपले कॅमेरे सांभाळत त्यांच्या आगेमागे धावतील.

साहेब आता येता जाता बाइट्स देतील.

अधूनमधून टीव्हीवर झळकतील.

पेपरात पानभर मुलाखती येतील. त्यात ते मुक्त चिंतन करतील!

लोकशाहीच्या मूल्यांबद्दल ते कोणाकोणाला मार्गदर्शन करतील.

गृहमंत्री म्हणून दरारा नि रूबाब वाढेल.

मग तेरा महिन्यांच्या सत्ता विरहात सोडून गेलेला गोतावळा एक एक करून परत येईल..

साहेब वाट पाहतील..

आतुरतेने..

मंजुळाबाईंची.

बबनरावांचं मंत्रीपदच गेलं नाही तर पक्षातूनही हकालपट्टी करून दुहेरी बदला तर घेऊन झाला.

मंजुळेला आता नंबर दोनवरचा गृहमंत्रीच भुलवू शकतो.

नाहीतर मुख्यमंत्री?

मंजुळाबाई दादासाहेब नाईकांकडे?

नाही! त्या आधीच साळुंखे साहेब हालचाल करतील..

आतापर्यंत मंजुळेनं बबनरावांचा फोन घेणं बंद ही केलं असणार!

साहेब अजून एका गोष्टीची वाट पाहतील..

आबुराव अन बाबुराव रिटर्न!

अप्पासाहेबांच्या सत्तेचा गूळ नसला तर हे मुंगळे चिकटणार कुठल्या ढेपेवर!

आबु अन बाबु आता साहेबापुढे नाक रगडतील.. चुका धोतराच्या सोग्यात नाहीतर सदऱ्याच्या खिशात घ्या म्हणून रडतील.. भेकतील..

साहेब ही मोठ्या मनानं त्यांना माफ करून आपल्या पंखाखाली घेतील.

एकतर दोघांना कामाचा 'अन्भव' दांडगा.

त्यात आता हे शत्रूपक्षाच्या आतल्या गोटातून आलेले.

त्यांच्याबद्दलची बित्तंबातमी नि तेरा महिन्यांतली अंडीपिल्ली ठाऊक असणार या बेरक्यांना.

साहेब त्यांना 'एकवार चूक तर द्येव पन माफ करतो..' म्हणत आपल्या जवळ ठेऊन घेतील..

आणि खुद्द साहेब?

गृहमंत्रीपद झाले.

दोन नंबर!

आता पुढची एक पायरी.

अर्थातच एक नंबर!

मुख्यमंत्रीपद!

साळुंखेसाहेब आता कामाला लागतील..

कामाला लागतील म्हणजे?

शेवटची पायरी सोपी नसेल पण हिशेब सोपा सरळ आहे!

साहेबांनी आपलं नवीन लक्ष्य ठरवलं असेल.

तेच ते गडबडपुर राज्याचे सिंहासन!

आपल्या गृहमंत्रीपदाच्या खुर्चीवरून मुख्यमंत्रीपदाची खुर्ची मिळवायला कुठं कुठं कसं कसं नि कधी कधी पक्षांतर करावं लागेल याचा ते अंदाज घ्यायला लागतील!




साहेबांना गृहमंत्री होऊन काही तास उलटलेत.. अदमास घेत साहेब आता पर्यंत जोरदार तयारीला लागलेही असतील कदाचित!


डॉ. नितीन मोरे यांची ५०+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.
















डॉ. नितीन मोरे
२अंकी बालनाट्य



लाडोबा
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
INSTANT कालिदास



ब्र


डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री नाटक


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे


एका डॉक्टरची कोविडकथा
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे

चक्रमादित्य भाग १ ते ५


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.





डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0






HOSTEL-I


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २



डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा ३



डॉ. नितीन मोरे






डॉ. नितीन मोरे
आणि





वाळूतील
रेषा



राग दरबारी


डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



आधुनिक कहाण्या






डॉ. नितीन मोरे






डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे


सांगतो
ऐका



डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे





डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची 'परी'कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे




सुलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे एक्कावन्नावे पुस्तक.

या पुस्तकाबरोबरच डॉ. नितीन मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश

नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (५१ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३५), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (४), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (७), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखान्नीस (३), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (२), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३)असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "ई"यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahity@gmail.com

www.esahity.com

**9869674820** (for free books on whatsapp)